पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई । वर्ष: 06 । अंक: 7 । 1 एप्रिल, 2024 । पृष्ठसंख्या: 36 । किंमत: 5 रू.



# पहिले मत देशासाठी



## अध्यक्षीय मनोगत

# युवकांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी

पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी जी यांनी २०१४ साली प्रथम पंतप्रधान झाल्यापासून युवकांच्या कल्याणावर विशेष लक्ष दिले आहे. भारत हा युवकांचा देश आहे. युवाशक्तीच्या जोरावर भारत विकसित राष्ट्र होऊ शकतो. त्यांच्यासाठी योग्य धोरणे तयार करणे, पायाभूत सुविधा निर्माण करणे, पोषक वातावरण निर्माण करणे आणि संधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. मोदीजींच्या सरकारने गेल्या दहा वर्षात नेमके हेच काम केले आहे. त्याच सोबत २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र करण्याचा निर्धार मोदीजींनी केला आहे. त्यांच्या नेतृत्वात गेल्या दहा वर्षात भारताची अर्थव्यवस्था जगात ११ व्या स्थानावरून पाचव्या स्थानावर आली आहे. आगामी पाच वर्षात भारताची अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकावर नेण्याची गॅरंटी मोदीजींनी दिली आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा विस्तार आणि विकास होणे याचा अर्थ देशात आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणावर वाढून अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे आहे. मोदीजींनी युवकांना स्वतःच्या पायावर उभे राहता येईल आणि सोबत काहीजणांना रोजगारही देता येईल यासाठी मुद्रा योजना यशस्वीपणे राबवली. मोदी सरकारमुळेच 'स्टार्ट अप्स'च्या बाबतीत भारताने जबरदस्त कामगिरी केली. मोदी सरकारने युवकांच्या आकांक्षा आणि बदललेली परिस्थिती या सर्वांचे भान ठेऊन नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू केले. आंतरराष्ट्रीय पातळीवरील बदल ध्यानात घेऊन मोदीजींनी डिजिटल क्रांती केली. आज आर्थिक देवाणघेवाणीसाठी भारतात होत असलेले डिजिटल पेमेंट हे संपूर्ण जगासाठी आदर्श उदाहरण ठरले आहे. रस्त्यावरील भाजी विक्रेत्याकडूनही आपण डिजिटल पेमेंट करून भाजी विकत घेऊ शकतो हे पाहून परदेशी पाहुणे आश्चर्यचकित होतात. मोदी सरकारने गेल्या दहा वर्षात रस्ते, उड्डाणपूल, विमानतळ, बंदरे अशा पायाभूत सुविधांच्या विकासाच्या बाबतीत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. केवळ मोदी सरकारमुळेच राज्यातील महत्त्वाच्या शहरांमध्ये मेट्रो सेवेची कामे चालू असून अनेक ठिकाणी ही सेवा सुरूही झाली आहे. मोदी सरकारने क्रीडा सुविधांच्या विकासासाठी हजारो कोटी रुपये खर्च केले आणि क्रीडा क्षेत्रासाठी पोषक वातावरण निर्माण केले. याचे चांगले परिणाम आपण ऑलिंपिक आणि आशियाई क्रीडा स्पर्धातील भारताच्या उंचावलेल्या कामगिरीच्या स्वरुपात पाहत आहोत. देशातील कोट्यवधी युवक युवतींच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी मोदी सरकारने गेल्या दहा वर्षात फार मोठे काम केले आहे. आगामी काळात मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत जी विकासाची झेप घेईल त्यामुळे युवावर्गाला एका विकसित राष्ट्रात राहण्याचे भाग्य लाभणार आहे. युवकांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मोदी सरकारने केलेले काम घरोघर पोहोचवू या आणि विकसित भारताच्या संकल्पात त्यांना सहभागी करून घेऊ या. या लोकसभा निवडणुकीत युवक युवतींचे विशेषतः नवमतदारांचे शतप्रतिशत मतदान होईल यासाठी आपण सर्वांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे गरजेचे आहे. सर्वांच्या सहभागाने आणि सर्वांच्या हितासाठी मोदीजींच्या नेतृत्वात विकसित भारत घडवयाचा आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




०४ पहिले मत देशासाठी



०६ 'उबाठां' चा संगीत खंजीर कल्लोळचा प्रयोग



०८ म्हणूनच म्हणतात ही 'मोदींची गॅरंटी' आहे



१० काँग्रेसला आयकर भरण्यासाठी दिलेली नोटीस योग्यच



१४ चोर तो चोर वर शिरजोर



१७ 'सीएए'भारतीय मुस्लिमांच्या विरोधात नाही






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना
विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

**संपादकीय सल्लागार**

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

**विभागीय समन्वयक**

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०

# पहिले मत देशासाठी

● पंतप्रधान नरेंद्र मोदी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच वेगवेगळ्या माध्यमांतून प्रथम मतदान करणाऱ्या मतदारांशी थेट तसेच व्हर्चुअल पद्धतीने संवाद साधला. या संवादाचा संपादित अंश.

**पुढच्या** २५ वर्षांत तुम्हाला स्वतःचे आणि देशाचे भविष्य ठरवायचे आहे. स्थानिक, जिल्हा, राज्य आणि केंद्र पातळीवर होणाऱ्या निवडणुकांमध्ये तुमची जबाबदारी मोठी असेल. ज्याप्रमाणे १९४७ च्या २५ वर्षे आधी देशाला स्वतंत्र करण्याची जबाबदारी तरुणांवर होती. त्याचप्रमाणे, २०४७ पर्यंत म्हणजेच पुढील २५ वर्षांत भारताला विकसित देश बनवण्याची जबाबदारी तुमची आहे. आजच्या भारतात तुमचे नाव सुवर्णाक्षरात कसे लिहिले जावे हे तुम्हीच ठरवायचे आहे. १८ ते २५ या वयात एखाद्याचे जीवन अनेक बदलांचे साक्षीदार असते. हे वय काही तरी घडवून दाखवण्याचे असते. या बदलांमध्ये तुम्हा सर्वांना मिळून आणखी एक जबाबदारी पार पाडायची आहे. जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीत सहभागी होण्याची ही जबाबदारी आहे. स्थिर सरकार असते तेव्हा देश मोठे निर्णय घेतो. अनेक दशकांपासून प्रलंबित असलेल्या समस्या सोडवून पुढे जातो.


आमच्या सरकारने पूर्ण बहुमताने जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० हटवून अनेक दशकांची प्रतीक्षा संपवली आणि भविष्यातही असे निर्णय घेतले जातील. आमच्या सरकारने पूर्ण बहुमत असल्यामुळेच लष्करातील जवानांसाठी वन रँक, वन पेन्शन लागू करून देशाच्या माजी सैनिकांची चार दशकांची प्रतीक्षा संपवली आहे. देशाचा विकास आणि तुमचे एक मत, दोन्ही एकमेकांशी जोडलेले आहेत. तुमचे एक मत भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवेल. तुमचे एक मत भारतात



स्थिर आणि मोठ्या बहुमताचे सरकार आणेल. तुमचे एक मत डिजिटल क्रांतीला अधिक ऊर्जा देईल. तुमचे एक मत भारताला स्वबळावर अवकाशात घेऊन जाईल. तुमच्या एका मताने भारतातील पहिले प्रवासी विमान बनेल. तुमचे एक मत भारताची विश्वासार्हता वाढवेल. मला आनंद आहे की, देशातील तरुण मंडळी घराणेशाहीच्या विरोधात आहेत. घराणेशाही (नेपोटिझम) हा एक असा आजार आहे जो देशातील तरुणांना पुढे जाण्यापासून रोखतो. इतर तरुणांना घराणेशाहीला प्रोत्साहन देणाऱ्या पक्षांमध्ये कधीच पुढे जाता येत नाही. अशा पक्षांची विचारसरणी युवकविरोधी आहे. आज जगात भारताची विश्वासार्हता एका नव्या उंचीवर आहे. आज भारताच्या पासपोर्टकडे जगभरात मोठ्या अभिमानाने पाहिले जाते. तरुणांसाठी ही मोठी संधी आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षांत विक्रमी थेट परदेशी गुंतवणूक भारतात आली आहे. भारताचा परकीय चलनाचा साठाही आज विक्रमी पातळीवर आहे. आपल्या देशाची अवस्था एकेकाळी अत्यंत वाईट झाली होती. त्यावेळी देशाला सोने गहाण ठेवण्याची वेळ आली होती. आता परिस्थिती बदलली आहे. आमचे सरकार तरुण मतदारांची शक्ती वाढवण्यासाठी आणि त्यांची सर्व स्वप्ने

## देशात २० कोटी नवीन मतदारांची नोंदणी झाली आहे, जे पहिल्यांदाच मतदान करणार आहेत






**नवमतदारांना मतदानासाठी जागरूक करण्यासाठी भारत सरकारने सुरु केलेल्या 'मेरा पहला वोट देश के लिए' या मोहिमेत गोव्यातील कावी कलाकार सागर नाईक-मुळे सहभागी झाले. या कलाकाराने देशभरातील नामवंत व्यक्तींच्या स्वाक्षऱ्यांसह कॅनव्हासवर नव मतदारांना मतदान करण्यास प्रोत्साहित करणारी कावी कलाकृती साकारली आहे. कावी कलेमध्ये गोव्याच्या जांभा दगडाच्या लाल मातीमध्ये आढळणाऱ्या चमकदार लाल रंगाचा वापर करून विविध माध्यमांद्वारे कुशलतेने विविध संकल्पना जिवंत केल्या जातात. या कलाकृतीत वापरण्यात आलेल्या स्वाक्षऱ्या या ज्यांचा उल्लेख पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या या संवादामध्ये 'मन की बात' मध्ये केला आहे त्या विविध व्यक्तिमत्त्वांच्या आहेत. 'मन की बात'च्या १०० भागांच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमासाठी सागर नाईक-मुळे यांना दिल्लीत आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमातच त्यांनी कार्यक्रमाला उपस्थित सर्व निमंत्रितांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या होत्या, त्यापैकी बरेचजण पद्म पुरस्कार विजेते आहेत. या कावी कलाकाराने हा स्वाक्षऱ्या केलेला कॅनव्हास जतन केला होता आणि आगामी निवडणुकीत मतदान करून राष्ट्र उभारणीत सक्रीय भागीदार होण्यासाठी तरुणांना प्रोत्साहित करण्यासाठी त्याचा वापर करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. कावी कलाकार सागर नाईक-मुळे यांनी ही कलाकृती राष्ट्राला समर्पित केली आहे आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी राष्ट्राच्या मातीतून साकारलेली कलाकृती असे या कलाकृतीचे त्यांनी वर्णन केले आहे.**

पूर्ण व्हावीत यासाठी अहोरात्र काम करत आहे. ही मोदींची हमी आणि तुमची स्वप्ने हेच माझे संकल्प आहेत.

अर्थव्यवस्थेच्या वाढीमुळे युवकांना वेगवेगळ्या क्षेत्रात रोजगार, स्वयंरोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. आपला देश आता पूर्वीसारखा राहिला नाही. जगातील अन्य प्रगत देशांप्रमाणेच भारताची अर्थव्यवस्था वेगाने घोडदौड करीत आहे. जगात सर्वाधिक युवकांची संख्या भारतात आहे. या युवकांच्या सहभागानेच विकसित भारताचा संकल्प प्रत्यक्षात आणावयाचा आहे. वेगाने विकास करताना भारताने पर्यावरण रक्षणाकडेही जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे. शून्य उत्सर्जनाचे लक्ष्य साध्य करण्यासाठी भारताने अनेक पावले टाकली आहेत.

देशाच्या विकासासाठी स्थिर सरकारने असणे अत्यंत गरजेचे असते. पूर्ण बहुमताचे सरकार देशहिताचे निर्णय धाडसाने घेऊ शकते. आमच्या सरकारने पूर्ण बहुमत असल्यामुळेच काश्मीरसाठीचे ३७०वे कलम रद्द करण्याचा निर्णय घेतला. ३७०व्या कलमाचा विषय अनेक वर्षे प्रलंबित होता. हे कलम रद्द करणे देशहिताच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक होते. हे कलम रद्द केल्यास हिंसाचार होईल, या पद्धतीच्या धमक्या दिल्या गेल्या होत्या. मात्र काश्मीरमध्ये तसे काही झाले नाही, हे संपूर्ण देशाने पाहिले. लष्काराच्या जवानांसाठी 'वन रँक, वन पेन्शन' लागू करण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात होती. मात्र ती पूर्ण होत नव्हती. आमच्या सरकारने ही मागणीही मान्य केली. तिहेरी तलाकसारखी प्रथा रद्द करून मुस्लिम महिलांवरील अन्याय दूर करण्याचे कामही आमच्या सरकारने धाडसाने केले. तुमचे एक मत देशाच्या विकासाला, प्रगतीला असणार आहे, हे लक्षात ठेवा. ■

# ‘उबाठां’ चा संगीत खंजीर कल्लोळचा प्रयोग



श्रीमान उद्धवराव ठाकरे यांनी आपल्या हुकमी खंजीर अस्त्राचा वापर पुन्हा केला आहे. यावेळी त्यांच्या खंजीराचे लक्ष्य होते प्रकाश आंबेडकरांची वंचित बहुजन आघाडी.

**२०१९** मध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणूका भारतीय जनता पार्टीच्या साथीत लढविणाऱ्या उद्धवरावांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याच नावावर मतांचा जोगवा मागितला होता. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात त्यावेळच्या शिवसेना उमेदवारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मोठ-मोठाली छायाचित्रे लावली होती. विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेने १६१ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले होते. निकाल जाहीर होत असताना उद्धवरावांना काँग्रेस आणि राष्ट्रवादी नेतृत्वाने खुणवाखुणवी चालू केली होती. भारतीय जनता पार्टी बरोबरची युती तोडा, आम्ही तुम्हाला मुख्यमंत्री बनविण्यासाठी पाठिंबा देतो, या काँग्रेस-राष्ट्रवादीच्या आमिषाला उद्धवराव सहजी बळी पडले. हिंदुत्वाच्या आधारावर झालेली भारतीय जनता पार्टी बरोबरची युती उद्धवरावांनी मुख्यमंत्रीपदाच्या लालसेपोटी निर्दयतेने तोडून टाकली. भाजपा बरोबरची युती तोडून मुख्यमंत्रीपद मिळवण्याचा तत्कालीक लाभ उद्धवरावांना महत्वाचा वाटला. युती तोडण्याचे भविष्यातील राजकीय परिणाम उद्धवरावांनी दुर्लक्षित केले. आपल्याला स्व:बळावर लढून मुख्यमंत्रीपद मिळणार नाही, याची खात्री असल्यामुळे त्यांनी ‘वर्षा’प्राप्तीसाठी भाजपा नेतृत्वाच्या पाठीत खंजीर खुपसला. भाजपाबरोबरची युती तोडण्यास एकनाथ शिंदेंसारखे यांच्यासारखे अनेक सहकारी विरोध करीत असताना त्याकडेही उद्धवरावांनी आणि त्यांच्या चिरंजिवांनी दुर्लक्ष केले. ज्या हिंदुत्वासाठी वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी प्रखर लढा दिला, त्याच हिंदुत्वाला सोडचिट्ठी देताना उद्धव ठाकरेंनी आपल्याला सत्तेपुढे तत्व, विचारसरणी यासारख्या गोष्टींना महत्व नाही, हेच सिद्ध केले. अनेकदा विनंती करूनही उद्धवराव काँग्रेस-राष्ट्रवादीबरोबरची आघाडी तोडण्यास तयार नाहीत, हे पाहून एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना काँग्रेस-राष्ट्रवादीबरोबरच्या आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घ्यावा लागला. भारतीय जनता पार्टी नेतृत्वाचा विश्वासघात करून उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रीपद मिळवले. मात्र त्याबदल्यात काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमागे फरपटत जाण्याची नामुष्की त्यांच्यावर आली.

वंदनीय बाळासाहेबांनी संपूर्ण हयातीत ताठ मानेने राजकारण केले. २००७ आणि २०१२ च्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत वंदनीय बाळासाहेबांनी काँग्रेसला जरूर पाठिंबा दिला. मात्र त्यांनी हिंदुत्वाचा त्याग केला नाही. काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांच्या यात्रेचा शिवाजी पार्कवर नुकताच समारोप झाला. या सभेत बोलताना उद्धव ठाकरेंना, ‘माझ्या तमाम हिंदू बंधू आणि भगिनींनो’, हे शब्द उच्चारण्याची हिंमतही झाली नाही. वंदनीय बाळासाहेबांच्या प्रत्येक सभेची सुरूवात याच शब्दांनी आणि त्याला मिळणाऱ्या टाळ्या-शिट्ट्यांच्या प्रचंड प्रतिसादाने होत असे. बाळासाहेबांच्या त्या शब्दांनी

उपस्थित जनसागर मंत्रमुग्ध होत असे. उद्धवरावांना आता काँग्रेसची मर्जी राखायची असल्यामुळे त्यांना हिंदुत्वासारखा शब्द उच्चारण्याची परवानगी नाही, हे पाहून वंदनीय बाळासाहेबांच्या आत्म्याला किती वेदना झाल्या असतील, याची कल्पनाही करवत नाही.

दीड वर्षापूर्वी मुख्यमंत्रीपद गेल्यानंतर उद्धव ठाकरेंना राजकारणात टिकण्यासाठी आधाराची गरज भासू लागली. याच गरजेपोटी त्यांनी प्रकाश आंबेडकरांच्या वंचित बहुजन आघाडीपुढे सहकार्याचा हात पुढे केला. आंबेडकरांनीही त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला. लोकसभा निवडणुकीची लगबग सुरू झाल्यानंतर प्रकाश आंबेडकरांनी उद्धव ठाकरे यांच्या बरोबरची आघाडी कायम ठेवण्याला प्राधान्य दिले. महाविकास आघाडीत उद्धव ठाकरे यांनी जागा वाटपात आमची बाजू काँग्रेस-राष्ट्रवादीला पटवून द्यावी, अशी भूमिका प्रकाश आंबेडकरांनी वारंवार घेतली होती. जागा वाटपासाठी बैठकांची लगबग सुरू झाल्यावर उद्धव ठाकरेंना प्रकाश आंबेडकरांपेक्षा काँग्रेस आणि शरद पवार महत्वाचे वाटू लागले. काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून जागा वाटपामध्ये आपला योग्य तो सन्मान राखला जात नाही, हे लक्षात आल्यानंतर प्रकाश आंबेडकरांनी याबद्दलचा संताप जाहीरपणे व्यक्त केला. हा संताप व्यक्त करताना प्रकाश आंबेडकरांनी उद्धव ठाकरेंचे सल्लागार संजय राऊत यांच्यावर अत्यंत गंभीर आरोप केले. संजय राऊतांनी वंचित बहुजन आघाडीच्या पाठीत खंजीर खुपसला, अशा शब्दात प्रकाश आंबेडकर यांनी आपला उद्वेग जाहीरपणे व्यक्त केला.

काँग्रेसने आंबेडकरी चळवळीचा कायमच अपमान केला आहे. कोट्यवधी उपेक्षितांची प्रेरणा असणाऱ्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना काँग्रेस नेतृत्वाने लोकसभा निवडणुकीत दोनदा पराभूत केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी काँग्रेसवर अनेकदा कठोर टिकेचे प्रहार केले होते. आंबेडकरी चळवळ काँग्रेसच्या दावणीला बांधायची नाही, हाच डॉ.बाबासाहेबांचा वज्र निर्धार होता. हा विचार त्यांनी आयुष्याच्या अखेरपर्यंत स्वाभिमाने जपला. जागा वाटपामध्ये काँग्रेस-राष्ट्रवादीपुढे आम्ही लाचारी पत्करणार नाही, असे प्रकाश आंबेडकरांनी अनेकदा सांगितले. आपल्याप्रमाणे आंबेडकरांनीही काँग्रेस आणि शरद पवारांमागे स्वाभिमान गुंडाळून फरपटत यावे, अशी उद्धव ठाकरेंची अपेक्षा असेल. ही अपेक्षा पूर्ण करण्यास प्रकाश आंबेडकरांनी नकार दिला. राजकारणात दीर्घकाळ टिकायचे असेल तर आपली विश्वासार्हता राखली पाहिजे, हा राजकारणाचा प्राथमिक नियमही उद्धव ठाकरेंना मान्य नसावा. त्यामुळेच त्यांनी प्रकाश आंबेडकरांपेक्षा काँग्रेस आणि शरद पवारांना प्राधान्य दिले असावे. भारतीय जनता पार्टीशी एकट्याने लढण्याची आपली कुवत नाही, हे उद्धव ठाकरेंना आता लक्षात आले आहे. बुडत्याला काडीचा आधार, म्हणून ते काँग्रेस आणि शरद पवारांना लोंबकळत आहेत. हे सर्व करीत असताना आपला स्वाभिमान, हिंदुत्वाची विचारसरणी खुंटीला गुंडाळून ठेवताना उद्धव ठाकरेंना वंदनीय बाळासाहेबांनाही विसरावे लागले आहे. काँग्रेस आणि शरद पवारांची मर्जी राखत आपले उरले-सुरले अस्तित्व टिकवण्यासाठी धडपड करणे, हेच उद्धव ठाकरेंचे प्राक्तन आहे. ■

**उद्धवरावांच्या राजकीय कारकिर्दीकडे पाहिले की, त्यांनी खंजीराचा प्रयोग राजकारणात पाऊल टाकल्यापासून अनेकवेळा केल्याचे दाखले मिळतात. शिवसेना जेव्हा संघर्ष करत होती तेव्हा उद्धव ठाकरे संघटनेच्या बांधणीत कधीच सहभागी झाले नव्हते. त्यांचे चुलत बंधू राज ठाकरे यांनी भारतीय विद्यार्थी सेनेची बांधणी करण्यासाठी आणि एकूणच शिवसेनेच्या प्रसारासाठी मोठी मेहनत घेतली होती. १९९५ मध्ये भाजपा-शिवसेना युती सत्तेत आल्यानंतर उद्धव ठाकरेंचा शिवसेनेतील वावर अचानक वाढला. खरे तर बाळासाहेब ठाकरे यांचे वारसदार म्हणून राज ठाकरे यांच्याकडे पाहिले जात होते. उद्धव ठाकरेंनी शिवसेनेत सक्रिय झाल्या-झाल्या राज ठाकरे यांचे संघटना बांधणीतील योगदान दुर्लक्षित करून स्वत:कडे शिवसेनेची सूत्रे केंद्रीत केली. सख्या चुलत आणि मावस भावालाही संघटनेत बेदखल केले. त्यामुळे राज ठाकरेंना संघटनेबाहेर पडण्याशिवाय पर्यायच राहिला नाही. अशीच वेळ ज्येष्ठ नेते नारायण राणे यांच्यावरही आणली गेली. राज ठाकरे आणि नारायण राणे यांच्यासारखा लढाऊ कार्यकर्त्यांना गमावल्यानंतर शिवसेनेची खऱ्या अर्थाने वाताहात सुरू झाली. असे करून उद्धवरावांनी आपली विश्वासार्हता कायमची गमावून टाकली.**

# म्हणूनच म्हणतात ही 'मोदींची गॅरंटी' आहे

● सुजीत भोगले

> प्रधानमंत्री आवास योजना- या योजनेत गेल्या ९ वर्षात ३ कोटी पेक्षा अधिक घरे ग्रामीण आणि शहरी भागात बांधली गेली आहेत. प्रत्येक घराची एक गोष्ट आहे. अशीच एक मला माहिती असलेली गोष्ट सांगतो.

**माझ्याकडे** एक कांबळे नावाचा कामगार होता. कोरोना काळात तो मूळ गावी गेला. येरमाळा जवळील छोटे खेडे हे त्याचं गाव होते. तिथे त्यांचे छोटे पत्र्याचे घर होते. ही मंडळी तिथे जाऊन राहू लागल्यावर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी त्यांच्याशी संपर्क साधला. संपूर्ण गावात दोनच कच्ची, पत्र्याची घरे आहेत. त्यात तुमचे आहे. तुम्हाला प्रधानमंत्री आवास योजनेत मदत मिळवून देतो, तुम्ही पक्के घर बांधा. आता सगळ्या ग्रामपंचायतींना आदेश आला आहे की गावात एकही कच्चे घर नको. कागदपत्रे घेतली आणि या कांबळेनाआणि त्याच्या समोर रहाणाऱ्याला घर मंजूर झाले आणि त्यांना पहिला हप्ता १५००० चा थेट त्यांच्या खात्यात जमा झाला. आठ दिवसात या कांबळेंनी चौथरा बांधून घेतला. शेजाऱ्याने काहीच केले नाही.

परत ग्रामपंचायत अधिकारी घरी आले त्यांनी याला सांगितले आता पुढील हप्ता मिळेल. समोर राहणाऱ्या माणसाला सांगितले तू कामच सुरु केले नाहीस. लवकर काम सुरु कर अन्यथा पैसे परत कर. या योजनेचे tracking, satellite द्वारे होते त्यामुळे तुम्ही खरंच घर बांधत आहात का नाही यावर सरकारची थेट नजर असते. पुढे वेळोवेळी त्याला हप्ते मिळत गेले. एक मोठी खोली, एक स्वयंपाकघर आणि संडास व न्हाणीघर इतके घर



**पंतप्रधान आवास योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे घराच्या बांधकामाची प्रगती पाहून अर्थसाह्याचे पैसे लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होतात. पूर्वी कोणी असा विचारच करू शकत नसेल की इकडे एक बटण दाबले आणि तिकडे गरिबांच्या बँक खात्यांमध्ये पैसे पोहोचले. मात्र हे मोदींचे सरकार आहे. गरिबांच्या हक्काचे पैसे थेट त्यांच्या खात्यामध्ये पोहोचतात! सरकारच्या इतर योजनांप्रमाणेच वेगवेगळ्या योजनांचे पैसे देखील थेट तुमच्या खात्यांमध्ये पोहोचतील. त्यामधे न कोणी मध्यस्थ, ना कट, ना कमिशन आणि ना कोणाच्या शिफारसीसाठी फेऱ्या मारण्याची गरज!**

यासाठी त्याला १.६४ लाख रु. मिळाले. त्यात घर बांधून झाले. नवरा बायकोचा घरासमोर फोटो काढून शेवटचा हप्ता प्राप्त झाला. एक रुपयाचा भ्रष्टाचार नाही. योजनेचा गैरफायदा घेऊन पैसे हडप करणे नाही. एका गरीब कुटुंबाला आपले स्वतःचे हक्काचे घर मिळाले. कांबळे आणि कुटुंबीय संपूर्ण आयुष्यभर रिपब्लिकन नेते सांगतील त्याला मतदान करणारी मंडळी. पण यावेळेस ते मोदींना मतदान करतील या बद्दल संशय नाही. एक शासकीय योजना भ्रष्टाचारमुक्त पद्धतीने आणि कुठलेही एजंटगिरी होऊ न देता राबवणे ही सुद्धा EVM² Hack करण्याची

# मोदींची गॅरंटी विदेशातही चालते



ऑपरेशन गंगा




ऑपरेशन कावेरी



ऑपरेशन अजय



वॅक्सिन मैत्री

**लोकांचा त्यांच्यावर विश्वास आहे. देशाबद्दल अभिमानाची भावना पूर्वीपेक्षा जास्त आहे आणि लोकांचा विश्वासही वाढला आहे. जेव्हा मी बाहेर (परदेशात) जातो आणि परराष्ट्र धोरण स्पष्ट करतो, तेव्हा मला कळते की पंतप्रधान मोदी भारताप्रमाणेच विदेशातही काम करण्याची हमी देतात. मोदींची गॅरंटी भारतात जितकी वैध आहे, तितकीच परदेशातही वैध आहे. मोदींच्या गॅरंटीमुळेच 'ऑपरेशन गंगा', 'ऑपरेशन कावेरी' आणि 'ऑपरेशन अजय' यशस्वी झाले. 'वॅक्सिन मैत्री'च्या माध्यमातून आम्ही जगभरातील १०० देशांना लस दिली. मोदींच्या गॅरंटीमध्ये राजकीय दबावाला बळी न पडता वाजवी पेट्रोलचे दर राखण्याचाही समावेश आहे. पाणी, वीज आणि आरोग्य सेवा या मूलभूत गरजा पुरवल्या जातील, असा विश्वास आता लोकांना वाटत आहे. मोदींच्या गॅरंटीमुळे गेल्या ७५ वर्षांपासून परराष्ट्र धोरणात अनेक बदल झाले आहेत. दहशतवाद पुन्हा घडू नये, अशा प्रकारे दहशतवाद रोखणे हेच आमचे ध्येय आहे. युक्रेनबाबत पाश्चात्य देशांचे आमच्याशी मतभेद असू शकतात. परंतु आपल्या परराष्ट्र धोरणाचा मुख्य उद्देश भारताच्या हिताचे रक्षण करणे हा आहे आणि आपण इतर देशांशी सहमत होऊन त्यांच्या हिताचे रक्षण करणे आवश्यक नाही.**

**– परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, न्यूज १८ रायझिंग इंडिया समिटमध्ये बोलताना**

निन्जा टेक्निक आहे. परंतु शासकीय योजना म्हणजे आपल्या कार्यकर्त्यांनी सामान्य नागरिकांना आणि सरकारी अधिकाऱ्यांना मूर्ख बनवून तुंबड्या भरण्यासाठी असते ही तद्दन घराणेशाही समज असलेल्या कार्यकर्त्यांना आणि समर्थकांना असे सुद्धा EVM² Hack करता येते हे समजतच नाही. या योजनेतून गरिबांना हक्काचे घर मिळाले. तर मध्यमवर्गीय कुटुंबांना आयुष्यातील पहिले घर घेताना १.६० ते २.५७ लाख रुपयांपर्यंत आर्थिक लाभ मिळाला आहे. साधारणतः मध्यमवर्गीय हा कर भरून मरतो पण सरकारची कोणतीच योजना त्याला आर्थिक लाभ मिळवून देत नाही. ही माझ्यामते एकमेव अशी योजना होती ज्यात सरकार ने खिशात हात घालून आयुष्यातील पहिले घर घेणाऱ्या मध्यमवर्गीय माणसाला मदत केली. मला विचाराल तर या योजनेचे हे सर्वात मोठे यश आहे. ■

# काँग्रेसला आयकर भरण्यासाठी दिलेली नोटीस योग्यच



● आनंद देवधर

> काँग्रेसने नुकतीच तातडीची पत्रकार परिषद घेऊन मोदी सरकारने इन्कम टॅक्स वसूल करण्यासाठी आमची सगळी खाती गोठवली आहेत असा प्रचंड नाटकी कांगावा केला. खरंतर दिल्ली उच्च न्यायालयाने काँग्रेस ज्या केसबाबत आरडाओरडा करत होती त्याबाबत १३ मार्चलाच निकाल दिला होता. मग पत्रकार परिषद घ्यायला आठ दिवस का लावले?

**या** प्रश्नाचे उत्तर धक्कादायक आहे. पत्रकार परिषदेत मूल्यांकन वर्ष २०१८-१९ च्या केसचा उल्लेख करण्यात आला आणि त्याला १९९४-९५ चे जुने ठिगळ जोडले. परंतु पत्रकार परिषदेचे खरे कारण वेगळेच आहे. काँग्रेसला एका गोष्टीची प्रचंड भीती वाटत आहे. एका केसमध्ये दिल्ली हायकोर्टाने २० मार्च रोजी आपला निकाल राखून ठेवला होता. तो आपल्या विरुद्ध जाणार याची खात्री असल्यामुळे काँग्रेसने निकाल जाहीर होण्याआधीच २१ तारखेला तातडीने पत्रकार परिषद घेतली. भरपूर रडून भेकून स्वतः विषयी सहानुभूती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आता काँग्रेसला वाटणारी ही भीती काय आहे ते मी आज तुम्हाला सांगत आहे. मिडियामध्ये या गोष्टीची अजिबात चर्चा झालेली नाही. कारण तिथे बहुतेक सगळे दलाल भरले आहेत.

इन्कम टॅक्सने काही वर्षांपूर्वी काँग्रेसच्या गैरव्यवहारा संदर्भात अनेक ठिकाणी धाडी टाकून स्फोटक माहिति गोळा केली होती. ती अत्यंत धक्कादायक आहे. मध्य प्रदेश २०१३, २०१८ आणि लोकसभा २०१९ या तीन निवडणुकांच्या संदर्भात काँग्रेसने रोखीचे प्रचंड गैरव्यवहार केल्याचे आढळून आले आहे. या ऑर्डरमध्ये काँग्रेसचे मध्य प्रदेशातील दिग्गज नेते दिग्विजय सिंग आणि कमलनाथ यांचाही उल्लेख आहे. त्यामुळे इन्कम टॅक्सने मूल्यांकन वर्ष २०१४-१५ पासून २०२०-२१ अशा एकूण सात वर्षांसाठी पुन्हा मूल्यांकन करण्याच्या नोटिस पाठवल्या होत्या. यापैकी पहिल्या तीन वर्षांच्या म्हणजेच २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७ साठी काढलेल्या नोटीस कालबाह्य आहेत, असा अर्ज काँग्रेसने दाखल केला होता.

तो अर्ज दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळून लावला. अभिषेक मनू सिंघवी यांनी केलेले सर्व युक्तीवाद व्यवस्थित कारणमीमांसा करून दिल्ली हायकोर्टाने केराच्या टोपलीत टाकले आहेत. या ऑर्डरमध्ये दिल्ली हायकोर्टाने इन्कम टॅक्सने सादर केलेल्या सर्व पुराव्यांचा उल्लेख केला असून ही तिन्ही मूल्यांकन ३१ मार्च २०२४ पर्यंत पूर्ण होणार

आहेत. या तीन वर्षांचा मामला एकूण फक्त ५२० कोटी रूपये इतका आहे.

निवडणुकीचा खर्च तोंडावर असताना आमची बँक खाती गोठवली आहेत, खर्च करायला पैसे नाहीत, ही हुकूमशाही आहे, दडपशाही आहे असे आरोप केले गेले. लोकांची सहानुभूती मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न होता. यात असेही म्हटले गेले की सिताराम केसरी यांच्या काळातील म्हणजेच १९९४-९५ सालच्या केसमध्येही नोटीस पाठवण्यात आली आहे. इतकी जुनी केस उकरून काढण्यापर्यंत मोदी सरकारची मजल गेली आहे. ही शुद्ध छळवणूक आहे. मल्लिकार्जुन खर्गे, कधी नव्हे त्या पत्रकार परिषदेत उपस्थित राहिलेल्या सोनिया गांधी आणि पप्पू राहुल गांधी तिघांनी फुल ऑन ड्रामा केला.

काँग्रेसच्या या आरोपाला चहा बिस्कीट पत्रकारांनी उचलून धरले आणि भाजपला झोडायला सुरुवात केली. या सगळ्यांचे म्हणणे असे होते की ३० वर्षांपूर्वीचे प्रकरण केवळ काँग्रेसला छळण्यासाठी उकरून काढले आहे. हे तिघे आणि यांसारखे इतर पत्रकार जे ३० वर्षापूर्वीची केस उकरून काढली म्हणून गळा काढत आहेत त्या सगळ्यांनी तुमच्या पासून एक माहिती लपवून ठेवली आहे. केवळ तीस वर्षाचा उल्लेख करत आहेत इतर सर्व माहिती सांगत नाहीत. काही कमकुवत भाजपा समर्थकही कदाचित बॅकफूटवर गेले असतील किंवा हे काय चालवले आहे आपल्या सरकारने असा विचार त्यांच्या आणि इतर सामान्य नागरिकांच्या मनातही आला असणार. त्यांनी अजिबात गांगरून जाण्याचे कारण नाही. बॅकफूटवर जाण्याची गरज नाही.

**काँग्रेसची खाती गोठवली गेली आहेत ती आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी १९९४-९५ साठी नाहीत. तो मामला वेगळा आहे. काँग्रेस अत्यंत बेजबाबदार, बेमुर्वतखोरपणे, मग्रुरीने वागणारा पक्ष आहे. आपलं कोण काय बिघडवू शकतं या शेखीत तो नेहमीच वावरत असतो. आपण या देशाचे राजे आहोत हा माज त्यांच्या वागण्यात दिसून येतो.**

वस्तुतः १९९४-९५ सालीसुद्धा काँग्रेसने आपली खाती इन्कम टॅक्सला सादर केली नव्हती. ज्या केसबद्दल गळा काढला गेला ती केस काँग्रेस १९९७ सालीच हरली आहे. तिथपासून पुढे कमिशनर ऑफ इन्कम टॅक्स आणि इन्कम टॅक्स ट्रायब्यूनल इथे बरेच वर्षे चालली. काँग्रेसला यात अपयश आले. त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयात अपील केले. दिल्ली उच्च न्यायालयानेही २०१६ साली काँग्रेस विरोधात निकाल दिला होता. आर्थिक वर्ष १९९४-९५ साठी देय रक्कम ५३ कोटी रुपये इतकी आहे हे दिल्ली हायकोर्टात सिद्ध झाले आहे. तेंव्हापासून ही केस गेली सर्वोच्च न्यायालयात धूळ खात पडली आहे. मार्च महिन्यामध्ये सगळ्या पेंडींग डिमांड नोटिसेस काढल्या जातात. त्याप्रमाणे १९९४-९५ साठी नोटीस काढली गेली. कारण सुप्रीम कोर्टात याचा निकाल लागणे बाकी आहे. मोदी सरकारने तीस साल बाद नोटीस काढून काहीही चूक केली नाही. कायद्यानुसार देय असलेली रक्कम मागितली आहे. तो कोणत्याही पक्षाच्या केंद्र सरकारचा अधिकार आहे. यात मोदी सरकारने कोणत्याही प्रकारची सूडबुद्धी वापरलेली नाही. ■

## काँग्रेसने काय चुका केल्या?

**आम्हाला १४ लाखाचे उल्लंघन केल्याबद्दल १३५ कोटी रुपये भरावे लागत असतील तर ५२ कोटींचे उल्लंघन करणाऱ्या भाजपला ५६०० हजार कोटी रुपये भरावे लागतील.असा बेफाम आचरट आणि बिनबुडाचा आरोप अजय माखन यांनी केला होता. सेक्शन १३ नुसार निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत राजकीय पक्षाचे उत्पन्न करमाफ असते परंतु त्यासाठी खालील अटी आहेत. पक्षाची नोंदणी निवडणूक आयोगाकडे झाली असली पाहिजे. पक्षाने योग्य पद्धतीने हिशोब ठेवले पाहिजेत. दरवर्षी सीएकडून ऑडिट करून घेतले पाहिजे. पक्षाने आपले इन्कम टॅक्स रिटर्न विहीत मुदतीत सादर केले पाहिजे. एका व्यक्तीकडून २००० रूपयांपेक्षा जास्त रक्कम कॅशने स्वीकारण्यास मनाई आहे. २०००० रूपयांपेक्षा पेक्षा जास्त देणगी दिलेल्या प्रत्येकाचे नाव पत्ता आणि कोणत्या पद्धतीने पैसे दिले ही माहिती निवडणूक आयोगाला सादर केली पाहिजे. ही माहिती इन्कम टॅक्स रिटर्न सादर करण्याच्या तारखेच्या आतच सादर केली पाहिजे. असे केले नाही तर त्या वर्षासाठी पक्षाचे उत्पन्न करपात्र ठरते. काँग्रेसने तीन अटींचे उल्लंघन केले आहे. १४ लाखाच्या जवळपास रक्कम कॅशमध्ये जमा केली आहे. याची जाहीर कबुली त्यांनी स्वतःच दिली आहे.**

# कायद्याला तुच्छ लेखणारी कांगावखोरी

> आपली बँक खाती गोठविण्याच्या आयकर विभागाच्या निर्णयाविरुद्ध काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वाने पत्रकार परिषद घेतल्यानंतर काहीच तासांनी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मद्य घोटाळ्यासंदर्भात अंमलबजावणी संचालनालयाने अटक केली. २१ मार्च रोजी घडलेल्या या दोन घटनांमध्ये अनेक साम्यस्थळे आहेत. या दोन्ही घटनांनंतर काँग्रेस आणि 'आप'च्या नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी एकाच सुरात आणि स्वरात रडगाणे गाण्यास प्रारंभ केला.

**मोदी** सरकारकडून सूडबुद्धीने कारवाई होत असल्याचा घासून-घासून जीर्ण झालेला जुनाट आरोप करत काँग्रेस आणि 'आप'ने नेहमीप्रमाणेच कांगावा केला. ज्येष्ठ आणि जाणते म्हणून अनेकांकडून प्रशंसा होणारे शरदराव पवार यांनी लगेचच हार्मोनियम ओढत याच सुराची 'काळी पाच' लावली. गेल्या वर्ष-दीड वर्षात दिल्ली सरकारच्या मद्य घोटाळ्यासंदर्भात चौकशीसाठी अंमलबजावणी संचालनालयाने नऊ वेळा केजरीवाल यांना समन्स पाठविले होते. प्रत्येक वेळेला केजरीवाल यांनी न्यायालयात धाव घेत अंमलबजावणी संचालनालयासमोर चौकशीसाठी हजर होण्यास टाळाटाळ केली. याच घोटाळ्यासंदर्भात केजरीवाल यांचे घनिष्ठ आणि विश्वासू सहकारी मनीष सिसोदिया दीड वर्षांहून अधिक काळ तुरुंगाची हवा खात आहेत. सिसोदिया यांनी जामिन मिळवण्याचे आजवर केलेले सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले आहेत. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाने सिसोदिया यांना जामिनावर सोडण्यास नकार दिलेला आहे. केजरीवाल हे नौटंकी करण्यात कुप्रसिद्ध आहेत. त्यामुळे त्यांनी आणि त्यांच्या समर्थकांनी अंमलबजावणी संचालनालयाकडून पहिली नोटीस आल्यापासून अटक होईपर्यंतच्या कालखंडात आपला कसा छळ केला जात आहे, आपण कसे निर्दोष आहोत, हे दर्शवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. वारंवार न्यायालयात धाव घेऊन अंमलबजावणी संचालनालयापुढे कोणत्याही परिस्थितीत हजर राहायचे नाही, असा निर्धारच केजरीवाल यांनी केला होता. दिल्ली सरकारच्या मद्य धोरणात एका पैशाचाही भ्रष्टाचार झालेला नाही, असे केजरीवाल यांच्याकडून कर्कश्य आवाजात सांगितले जात होते. भ्रष्टाचार झालेला नाही, याची एवढी खात्री असताना अंमलबजावणी संचालनालयापुढे चौकशीसाठी उपस्थित राहण्यास केजरीवाल हे का टाळाटाळ करीत होते, याचे उत्तर मिळत नाही.

अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली सरकारचे मद्य धोरण का वादग्रस्त ठरले, याची पार्श्वभूमी पाहू. दिल्ली सरकारचे नवे मद्य धोरण २०२१ मध्ये लागू झाले. त्यानुसार दिल्ली महानगरातील मद्याच्या दुकानांची ३२ झोनमध्ये विभागणी करण्यात आली. प्रत्येक झोनमध्ये मद्य विक्रीची २७ दुकाने उघडली जातील, असेही जाहीर करण्यात आले होते. दिल्ली सरकारच्या अबकारी धोरणासाठी २०२० मध्ये मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करण्यात आली होती. मद्याच्या घाऊक पुरवठ्यासाठीचा 'एल१' परवाना दिल्ली सरकारने स्वत:कडे ठेवावा, अशी शिफारस केजरीवाल, सिसोदिया यांच्या समितीने केली होती. त्यावेळी अबकारी खात्याचा कार्यभार सांभाळणाऱ्या सिसोदिया यांनी मद्य परवाने देण्याची संपूर्ण प्रक्रिया खाजगी कंपन्यांकडे सोपवून टाकली. स्वच्छ आणि पारदर्शी कारभाराचा शब्द देऊन दिल्लीची सत्ता मिळवणाऱ्या केजरीवाल यांनी या ठेक्यांसाठी निविदा काढल्या नाही. घाऊक पुरवठ्यातील कमिशनचे प्रमाण २

टक्क्यांवरून १२ टक्क्यापर्यंत वाढवले गेले. लॉटरी पद्धतीने परवाने देण्याची शिफारस मान्य न करता संपूर्ण दिल्लीचे ३२ विभागात विभाजन करून १६ मद्य विक्रेत्यांना प्रत्येकी दोन विभाग दिले. लॉटरी पद्धतीने मद्याचे परवाने दिले असते तर या ठेक्यांसाठी निविदा भरणाऱ्यांची संख्या वाढली असती. परिणामी मद्य उत्पादक कंपन्यांनी घाऊक पुरवठ्याचा परवाना घेतला आणि किरकोळ विक्रेत्याचा परवाना घेतला. उत्पादक हाच वितरक आणि विक्रेताही बनला, हा मद्य घोटाळा आहे. ज्येष्ठ काँग्रेस नेते अजय माकन यांनीही केजरीवाल सरकारने मद्य धोरणात भ्रष्टाचार केला असल्याचा आरोप जाहीरपणे केला होता. केजरीवाल यांचे काँग्रेसने कोणत्याही परिस्थितीत समर्थन करू नये, असे अजय माकन यांनी जाहीरपणे सांगितले होते.

ज्या उत्पादक कंपन्यांनी मद्य पुरवठ्याचे परवाने घेतले त्या मंडळींनी कमिशन स्वरूपातली रक्कम कुणा-कुणाला आणि कशा स्वरूपात दिली, याची माहिती सुरूवातीच्या चौकशीत उघड झाली होती. ज्या उत्पादक कंपन्यांना घाऊक पुरवठ्याचे आणि किरकोळ विक्रीचे परवाने मिळाले, त्यांच्याकडून 'आप'शी संबंधित असलेल्या मंडळींना किती रक्कम पोच करण्यात आली, याचाही उलगडा चौकशीत झाला आहे. याच्याच आधारे सिसोदिया यांना अटक झाली. कमिशनरूपाने मिळालेला पैसा 'आप'ने गोवा आणि पंजाब विधानसभा निवडणुकीत काँग्रेसविरोधात वापरला, असा थेट आरोप अजय माकन यांनी केला होता. उत्पादन शुल्क विभागाने २५ ऑक्टोबर २०२१ रोजी मद्याच्या परवान्यांमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे केजरीवाल सरकारला कळवले होते. मात्र केजरीवाल सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. सर्वोच्च न्यायालयापुढे या उलाढालीत कोणा-कोणाला पैसे मिळाले (मनी ट्रेल), याची पुराव्यासकट साखळी तपास यंत्रणांनी उलगडून दाखवली होती. तरीही श्रीमान केजरीवाल यांनी आपला स्वच्छतेचा हेका कायमच ठेवला होता.

काँग्रेसने आपल्या बँक खात्यासंदर्भात केजरीवाल यांच्याप्रमाणेच नौटंकी चालू केली आहे. काँग्रेस नेतृत्वाचे वर्तन आम्हाला या देशाचे कायदे-कानून लागूच होत नाही, अशा थाटाचे असते. कायदा आणि नियमांपेक्षा आम्ही मोठे आहोत, अशाच तोऱ्यात काँग्रेसजन वावरत असतात. काँग्रेसच्या बँक खात्याबाबत नेमके काय झाले, हे जाणून घेऊ. २०१७-१८ या आर्थिक वर्षात काँग्रेसला आयकर विभागाला कर आणि व्याज मिळून २०५ कोटी रुपये इतके देणे होते. त्याविरोधात काँग्रेसने अपील केले आहे. अपील करताना मूळ रकमेच्या १० टक्के एवढी रक्कम जमा करावी लागते. मात्र काँग्रेसने एवढी रक्कम जमा करण्याची तसदी घेतली नव्हती. काँग्रेसने आयकर प्राधिकरणाकडे दाद मागितली होती. प्राधिकरणाने आयकर विभागाच्या वसुलीच्या कार्यवाहीला स्थगिती देण्याची मागणी फेटाळून लावली होती. गेल्या तीन वर्षांपासून आयकर विभागाने काँग्रेसकडे आयकर भरण्याची मागणी केली होती. मात्र काँग्रेसने आयकर विभागाच्या विनंतीकडे सातत्याने दुर्लक्ष केले. सामान्य माणसाला आयकर विवरण पत्र वेळेत दाखल न केल्याबद्दल तसेच आयकराचा भरणा वेळेत केला नाही तर दंड भरावा लागतो. तशाच पद्धतीने काँग्रेसवर कारवाई केली म्हणून काँग्रेस नेतृत्व शंख करीत आहेत. सामान्य भारतीयाला जो कायदा लागू आहे, जे नियम लागू आहेत ते आम्हाला लागू नाहीत, आम्ही कायद्यापेक्षा श्रेष्ठ आहोत, अशा गुर्मित काँग्रेसजन वावरत असतात. लोकसभा निवडणुकीच्या निकालात आपले बारा वाजणार आहेत, याची खात्री झाल्याने काँग्रेसने आता आमच्या नेत्यांना प्रवास करण्यासाठीही पैसे राहिलेले नाहीत, यासारखा बालिश कांगावा सुरू केला आहे. एवढे करूनही त्यांच्या पदरात काही पडणार नाही, हे निश्चित. एकदा तुमचे उत्पन्न करपात्र ठरले की त्या उत्पन्नावर तुम्हाला कर भरावा लागतो.मग तुम्ही एक दिवस उशीर केलेला असेल किंवा तुम्ही १०००० रुपये कॅश स्वीकारले असतील तरीही परिस्थिती बदलणार नाही. २०१८-१९ या मूल्यांकन वर्षा (ssessment Year) साठी काँग्रेसचे करपात्र उत्पन्न १९९ कोटी रुपये होते आणि त्यावर इन्कम टॅक्सने कर आणि व्याज आकारले आहे. ती रक्कम १३५ कोटी रुपये झाली. १४ लाखांच्या उल्लंघनावर १३५ कोटी रुपयांचा भुर्दंड हा अन्याय आहे, हे चुकीचे आहे असे प्रथमदर्शनी लोकांना वाटू शकते. परंतु ते १३५ कोटी रुपये १९९ कोटी रुपयांचा कर अधिक व्याज आणि दंड मिळून आहेत. १४ लाखाचा त्याचाशी काहीही संबंध नाही. हे सर्वांनी लक्षात घ्यावे. या आदेशाच्या विरोधात काँग्रेसने केलेले अपील पेंडिंग आहे. अपील दाखल करून घेण्यासाठी भरावी लागणारी २०% रक्कम भरण्यास नकार दिल्यामुळे काँग्रेसची खाती गोठवली गेली आहेत. ■

# चोर तो चोर वर शिरजोर

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना २१ मार्चच्या रात्री सक्तवसुली संचलनालय अर्थात ईडीने अटक केली. यापूर्वी सत्येंद्र जैन, मनीष सिसोदिया हेसुद्धा याच प्रकरणी तुरुंगात आहेत. सिसोदिया यांना न्यायालयाने अनेकवेळा जामीन नाकारला आहे.

**आम** आदमी पार्टीने या कारवाईला निवडणुकांपूर्वीचं सुडाचं राजकारण म्हटलंय, मात्र आता यामुळे आपच्या निवडणूक प्रचारावर, आणि दिल्ली सरकारच्या कामकाजावर परिणाम होऊ शकतो. पण दिल्लीतल्या या बड्या नेत्यांना ज्या प्रकरणात अटक करण्यात आली, तो कथित मद्य धोरण घोटाळा आहे तरी काय?

### मद्य धोरण कसं ठरलं?

सप्टेंबर २०२० मध्ये दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदियांनी अबकारी आयुक्त रवी धवन यांच्या नेतृत्वात नवीन मद्य धोरण ठरवण्यासाठी एक समिती नेमली.

ऑक्टोबर २०२० मध्ये साधारण महिन्याभराने रवी धवन समितीने सुमारे १४,७६१ पानांचा अहवाल सोपवला, ज्यात वेगवेगळे धोरणात्मक सल्ले होते. यावर दिल्ली मंत्रिमंडळात चर्चा झाली, आणि नवीन अबकारी धोरणाला मंजुरी देण्यात आली. पण दिल्लीचे तत्कालीन नायब राज्यपाल अनिलकुमार बैजल यांनी यात काही दुरुस्ती सुचवल्या. ज्यानंतर १७ नोव्हेंबर २०२१ रोजी दिल्लीत नवीन अबकारी धोरण, त्याच अंतर्गत येणारं नवीन मद्य धोरण लागू करण्यात आलं.

### नवीन मद्य धोरणाची गरज काय होती?

२०२० मध्ये दिल्ली सरकारने दारू माफियांवर कारवाई करत, सरकारी महसूल वाढवण्याच्या उद्देशाने नवीन मद्य



धोरणाचा प्रस्ताव मांडला. दिल्ली सरकारने दारू व्यवसायापासून स्वतःला वेगळं करत, सर्व व्यवहार आणि दुकानं खाजगी हातात दिली.

१७ नोव्हेंबर २०२१ ला लागू झालेल्या नवीन अबकारी धोरणांतर्गत दिल्लीची ३२ झोनमध्ये विभागणी करण्यात आली – ३० MCD, १ NDMC आणि छावणी क्षेत्र, १ दिल्ली विमानतळ झोन अशा प्रकारचे वेगवेगळे ३२ झोन तयार केले. प्रत्येक झोननुसार दारूची किंमत ठरवण्यात आली. प्रत्येक झोनमध्ये २७ दारूची दुकानं, NDMC आणि कॅन्टोन्मेंट क्षेत्रात २९, आणि दिल्ली विमानतळ झोनमध्ये १० दारूची दुकानं उघडली जाणार होती.

वेगवेगळ्या परवान्यांसाठी फी वेगवेगळी होती

L1– भारतीय मद्याच्या होलसेल विक्रीसाठीचा परवाना ५ कोटी रुपयांना होता.

L7– खासगी क्षेत्रातील भारतीय दारूच्या किरकोळ विक्रीसाठी परवाना ११.१८ कोटी रुपयांना होता.

धोरणातल्या काही प्रमुख गोष्टी अशा होत्या –

नवीन दारूची दुकानं उघडली जाणार नाहीत.

मद्यपानाचं वय २५ वरून २१ करण्यात आलं. सक्तीने MRPवरच दारू विक्री करण्याऐवजी दुकानदारांना स्वतः दर ठरवण्याचे स्वातंत्र्य देण्यात आलं.

हॉटेलमधील बार, क्लब आणि रेस्टॉरंट्स रात्री ३ वाजेपर्यंत सुरू ठेवण्यास परवानगी देण्यात आली होती.

**अरविंद केजरीवाल यांनी लोकपालासाठीच्या चळवळीच्या माध्यमातून राजकीय क्षेत्रात प्रवेश केला. त्यावेळी त्यांनी ज्या-ज्या सत्ताधाऱ्यांवर गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराचे आरोप केले त्या सर्वांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. सत्ताधाऱ्याने आरोप झाल्या-झाल्या राजीनामा दिला पाहिजे, असा केजरीवाल यांचा नैतिक आग्रह होता. मात्र स्वत:ला अटक होऊनही श्री. केजरीवाल हे खुर्चीला चिटकून बसले आहेत. राजकारण स्वच्छ करण्यासाठी हातात झाडू घेऊन उतरलेल्या केजरीवाल यांचेही पाय मातीचेच आहेत, हेच यातून दिसले.**



मद्य घोटाळ्यात भक्कम पुरावे असल्यानेच मनीष सिसोदिया यांना जामीन मिळू शकला नाही.

### घोटाळ्याचे आरोप कधी आणि कसे झाले?

८ जुलै २०२२ रोजी दिल्लीचे मुख्य सचिव नरेश कुमार यांनी नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना, आर्थिक गुन्हे शाखा, मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांना एक अहवाल पाठवला.

हा अहवाल सार्वजनिकरीत्या उपलब्ध नाही, मात्र उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री म्हणून सिसोदिया यांनी बेकायदेशीर मार्गांनी महसूल गोळा केला, असा त्यांच्यावर आरोप आहे. या अहवालात करण्यात आलेले काही ठळक आरोप असे -

अधिकाऱ्यांच्या मते, अंमलात आणलेल्या धोरणात कोणताही बदल करण्यापूर्वी उत्पादन शुल्क विभागाने ते आधी मंत्रिमंडळाकडे आणि नंतर नायब राज्यपालांकडे मंजुरीसाठी पाठवावे लागते. नाहीतर असा कुठलाही बदल बेकायदेशीर मानला जातो. कोरोनाच्या काळात दारू विक्रेत्यांनी परवाना शुल्क माफ करण्यासाठी दिल्ली सरकारशी संपर्क साधला. शासनाने २८ डिसेंबर ते २७ जानेवारी या कालावधीत परवाना शुल्कात २४.०२ टक्के सूट दिली. यामुळे परवानाधारकाला अवाजवी फायदा झाला आणि सरकारी तिजोरीचे अंदाजे १४४.३६ कोटी रुपयांचे नुकसान झाले.

मनीष सिसोदिया यांच्यावर विदेशी मद्याच्या किमती बदलल्याचा आणि ५० रुपये प्रति बिअर आयात शुल्क काढून परवानाधारकांना अवाजवी फायदा दिल्याचा आरोप झाला. पुद्दुचेरी-स्थित पिक्सी एंटरप्रायझेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने विमानतळ झोनमध्ये १० दारू दुकानांसाठी परवाने जिंकले होते, पण कंपनीला विमानतळ प्राधिकरणाकडून ना हरकत दाखला न मिळाल्याने दिल्ली सरकारने या कंपनीला त्यांनी परवान्यासाठी जमा केलेले ३० कोटी रुपये परत केले. अधिकाऱ्यांनुसार हे दिल्ली उत्पादन शुल्क नियम २०१०चं उल्लंघन होतं. सिसोदिया यांनी या परवानावाटपादरम्यान कमिशन घेतले, त्यांनी हा पैसा पंजाब विधानसभा निवडणुकीत वापरला, असे आरोप त्यांच्यावर झाले.

### कारवाई कशी सुरू झाली?

दिल्लीचे मुख्य सचिव नरेश कुमार यांच्या या अहवालाच्या आधारे प्राथमिक माहिती अहवाल दाखल करण्यात आला. हा अहवाल मिळाल्यानंतर १५ दिवसांतच नायब राज्यपालांनी गृह मंत्रालयाला पत्र लिहून सीबीआय चौकशीची शिफारस केली.सीबीआयने लगेचच त्या आधारे तपास सुरू केला, आणि १९ ऑगस्टला मनीष सिसोदिया आणि इतर १४ लोकांविरुद्ध एफआयआर दाखल केला. त्यात तत्कालीन उत्पादन शुल्क आयुक्त, ३ अधिकारी, २ कंपन्या आणि ९ व्यावसायिकांचा समावेश होता.

इथूनच या संपूर्ण प्रकरणाला राजकीय रंग लागला. दिल्लीतला विरोधी पक्ष भाजप केजरीवाल सरकारला यावरून घेरू लागला, अखेर मनीष सिसोदिया यांनी ३० जुलै २०२२ ला हे नवीन मद्य धोरण मागे घेण्याची घोषणा केली. आतापर्यंत या कथित घोटाळ्याप्रकरणी दिल्ली पोलीस, सीबीआय, ईडी अशा अनेक तपास संस्थांनी आम आदमी पक्षाच्या अनेक बड्या नेत्यांना अटक केली आहे. तसेच तेलंगणाच्या भारत राष्ट्र समितीच्या खासदार के. कविता यांनाही अटक करण्यात आली आहे. ■

# केजरीवालांचा इमानदारीचा बुरखा टराटरा फाडणारा मद्य घोटाळा

**दिल्लीचे** मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिल्ली सरकारच्या दारू घोटाळ्यात सक्तवसुली संचालनालयाने ईडीने २१ मार्च २०२४ ला अटक केली. हा घोटाळा नेमका काय आहे हे समजून घेतले तर त्याची व्याप्ती आपल्या लक्षात येईल. प्रत्येक राज्याचे महसुली उत्पादन अनेक घटकातून येत असते. त्यात मद्य/दारू हा एक घटक आहे. या मद्याची होणारी विक्री जितकी जास्त तेवढा सरकारी तिजोरीत अधिक महसूल हे त्यामागचे गणित. आता एखाद्या गोष्टीची मागणी वाढत जाईल तशी त्याची उत्पादकता आणि त्यानंतर विक्री वाढत जाते हा साधा व्यावहारिक नियम आहे. केजरीवालांनी दिल्ली सरकारचे जुने मद्य विक्री धोरण यासाठी बदलले आणि ते बदलताना त्याचा सर्वाधिक फायदा दारू उत्पादक कंपन्यांना मिळवून देऊन दिल्ली सरकारचे महसुली उत्पन्न बुडवले म्हणजे पर्यायाने दिल्ली सरकारचा करोडो रुपयांचा तोटा करून तेवढ्याच रुपयांचा भ्रष्टाचार केला.

**जुने मद्य विक्री धोरण**

एका ७५० मिली दारूच्या बाटलीमागे
घाऊक किंमत ₹१६६.७३
अबकारी कर ₹२२३.८८
व्हॅट ₹१०६.००
किरकोळ विक्रेते कमिशन ₹३३.३९
एमआरपी ₹५३०.००

**नवे मद्य विक्री धोरण**
**(जे केजरीवालनी मार्च २०२२ मध्ये आणले)**

एका ७५०मिली दारूच्या बाटलीमागे
घाऊक किंमत ₹१८८.४१
अबकारी कर ₹१.८८
व्हॅट १% ₹१.९०
किरकोळ विक्रेते कमिशन ₹३६३.२७
अतिरिक्त अबकारी कर ₹४.५४
एमआरपी ₹५६०.००

याचा अर्थ जुन्या धोरणानुसार सरकार एका बाटलीमागे ३२९.८९ रू. मिळवत होते तर नव्या धोरणानुसार ते फक्त ८.३२ रू. मिळवत होते. याचा अर्थ प्रत्येक बाटलीमागे सरकारने ३२१.५७ रू. चा हक्काचा महसूल बुडवला. यात ग्राहकांना कोणताच फायदा न होता प्रत्येक बाटली ३० रू. ने महागली. जुन्या धोरणानुसार किरकोळ विक्रेत्यांना ३३.३९ रू. मिळत तर नवीन धोरणानुसार तीच रक्कम तब्बल ३६३.२७ रू. झाली. म्हणजे साधारण ३३०.१२ रू ची घसघशीत वाढ.

यात सगळ्यात मोठी मेख कोणती होती तर ती म्हणजे दारू उत्पादक कंपन्यांनाच दारू विक्रीचे परवाने देणे जे पूर्णपणे बेकायदेशीर होते. पूर्वी उत्पादकांना विक्री परवाने मिळत नसत. दारू पिण्यासाठी पात्रता वय केजरीवाल यांनी १८ वर आणले आणि दुकानात विक्रीची वेळ वाढवून ती मध्यरात्री ३ वाजेपर्यंत वाढवली. सरकारी धोरणात असलेले जास्तीचे ड्राडे कमी करून ते ३ पर्यंत घटवले. हा सगळा खटाटोप करून केजरीवाल यांनी दारू उत्पादक कंपन्यांकडून करोडो रुपये घेतले आणि तेच पैसे गोवा आणि पंजाब निवडणुकीत वापरले.

या प्रकरणात आतापर्यंत १६ जणांना अटक झाली असून या सगळ्या घोटाळ्याचे प्रमुख सूत्रधार मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आहेत असे ईडीचे म्हणणे आहे. केजरीवालांचे अत्यंत विश्वासू मानले गेलेले उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया हे याच घोटाळ्यात गेले १४ महिने तुरुंगात असून त्यांना एकदाही जामीन मंजूर होऊ शकला नाहीय इतकी बंदिस्त केस (water tight) केस ईडीने बनवली आहे. त्यामुळे केजरीवाल यांचे भविष्य वेगळे असायची शक्यता अत्यंत धूसर आहे.

माझ्याकडे ते खाते नव्हते आणि यामध्ये माझा कोणताच सहभाग नाही असे सांगून केजरीवाल सगळ्यातून अंग काढून घेण्याचा प्रयत्न गेली वर्षभर करत होते. ईडीची तब्बल ९ समन्स त्यांनी धुडकावून लावली आणि ईडीने देखील कोणतीही घाई गडबड न करता सर्व काही प्रोसिजरनुसार असेल याची काळजी घेतली. ■

# ‘सीएए’भारतीय मुस्लिमांच्या विरोधात नाही

● राम माधव

> अमेरिकेसारख्या देशानेसुद्धा व्हिएतनाम युद्धानंतर फक्त व्हिएतनामी निर्वासितांच्याच नागरिकत्वाला विशेष त्वरेने सवलत दिली होती की नाही? म्हणजे अशा निवडक श्रेणींना वेळोवेळी नागरिकत्व देणे यात टीका करण्यासारखे काहीच नाही. मुस्लिमांचा तर उल्लेखदेखील ‘सीएए’मध्ये नाही; मग हा कायदा मुस्लीमविरोधी ठरवण्यात काय अर्थ आहे?

**संसदेने** १० डिसेंबर २०१९ रोजी मंजूर केलेल्या नागरिकत्व सुधारणा कायद्याचे (सीएए) नियम सरकारकडून आता राजपत्रित केले जात असताना, म्हणजे या कायद्याच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला असताना, या कायद्याला धर्मनिरपेक्षताविरोधी म्हणणारा आणि निर्वासितांचा दर्जा ठरवण्यासाठी धर्माचा आधार नकोच, असा युक्तिवाद पुन्हा उफाळून आला आहे. जागतिक स्तरावर, धर्म हा छळाच्या मुख्य घटकांपैकी एक मानला जातो आणि निर्वासित स्थितीसाठी तो एक महत्त्वाचा निकष आहे. नागरिकत्वाच्या अमेरिकी कायद्यात (यूएस कोड बुकमध्ये) ‘वंश, धर्म, राष्ट्रीयत्व, विशिष्ट सामाजिक गटातील सदस्यत्व किंवा राजकीय मतामुळे छळ होण्याची वाजवी भीती’ असलेल्यांबद्दल विशेष मानवतावादी काळजी बाळगून, अशी कोणतीही व्यक्ती निर्वासित मानली जाते.

छळ झालेल्या अल्पसंख्याकांच्या यादीतून मुस्लिमांना वगळल्यामुळे ‘सीएए मुस्लीमविरोधी आहे,’ अशी व्यर्थ टीका होते आहे. वास्तविक हा कायदा मुस्लिमांविरुद्ध




काहीही बोलत नाही. बांगलादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या– ज्यांनी खूप पूर्वी स्वत:ला इस्लामिक राष्ट्र म्हणून घोषित केले अशा– तीन शेजारी देशांमधील अल्पसंख्याक समुदायांच्या धार्मिक छळाच्या बळींबद्दलच हा कायदा आहे. तेथे मुस्लीम बहुसंख्य आहेत. त्यांनाही इतर कोणत्याही प्रकारच्या छळाचा सामना करावा लागला आणि त्यापायी भारतात आश्रय घ्यावा लागला, तर त्यांना इतर कायद्यांनुसार प्रवेश आहेच. खरे तर अनेक अफगाण निर्वासित भारतात राहतात. या देशांमध्ये राजकीय अस्थिरता आणि अल्पसंख्याकांवरील हिंसाचाराच्या घटना नित्याच्याच आहेत, परिणामी तेथे छळ झालेल्या अल्पसंख्याकांचे– मोठ्या प्रमाणात हिंदू, बौद्ध, शीख आणि ख्रिश्चन यांचे– भारताच्या सीमावर्ती राज्यांमध्ये स्थलांतर होत असते. हा ओघ सतत चालू असतोच पण तो काही वेळा प्रचंड प्रमाणात वाढला आहे : १९७१ च्या बांगलादेश युद्धात पूर्व पाकिस्तानातून एक कोटींहून अधिक निर्वासित बंगाल, बिहार आणि आसाममध्ये आले. १९९० च्या दशकात बांगलादेशच्या काही भागांमध्ये जातीय दंगली उसळल्या तेव्हाही ओघ असाच वाढलेला दिसला. याच १९९०च्या दशकात कट्टरपंथी इस्लामवाद्यांनी अफगाणिस्तानचा ताबा घेतल्याने हिंदू आणि शीख, विशेषत: काबूल आणि कंदाहारमधून आले. पाकिस्तानच्या बाबतीतही, हा अल्पसंख्याकांचा ओघ कायम आहे.

‘सीएए’ची व्याप्ती अगदी मर्यादित आहे आणि ती या प्रवाहाच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी आहे. मुळात ही ‘नागरिकत्व कायदा–१९५५’मधील सुधारणा आहे. हा

कायदा आपल्या भेदभावरहित कायद्यांचा भाग आहे. मूळ कायद्यात नागरिकत्वाच्या पाच श्रेणी– जन्म, वंश, नोंदणी, नैसर्गिकीकरण किंवा प्रदेश यांच्या आधारे– निर्धारित केलेल्या आहेत. पहिल्या दोन श्रेण्या जन्माने किंवा वंशाच्या भारतीयांसाठी आहेत, तर शेवटच्या तीन श्रेणी भारतीय नागरिकांशी विवाह किंवा भारतात कायदेशीर स्थलांतर यासारख्या विशिष्ट परिस्थितींमध्ये बिगर–भारतीयांसाठी उपलब्ध आहेत. १९८३ मध्ये ज्येष्ठ काँग्रेस नेत्या सोनिया गांधी किंवा २०१६ मध्ये जन्माने पाकिस्तानी असलेला गायक अदनान सामी यांनी मिळवलेल्या नागरिकत्वावरून मूळ कायद्याचे भेदभावरहित स्वरूप लक्षात यावे! गेल्या आठ ते नऊ वर्षांत सरकारने अशा शेकडो अर्जदारांना नागरिकत्व दिले आहे, त्यात ५५० पेक्षा जास्त मुस्लीमसुद्धा आहेत.

'सीएए'ने मूळच्या नागरिकत्व कायद्याचे हे स्वरूप बदललेले नाही. ही सुधारणा, 'छळ झालेल्या अल्पसंख्याकांसाठी ही प्रक्रिया जलदगतीने व्हावी म्हणून केवळ एक वेळचा विशेष उपाय' अशा स्वरूपाची आहे. सामान्य नियमांनुसार १२ वर्षे वाट पाहण्याऐवजी, या सुधारणेमुळे त्यांना पाच वर्षांत नागरिकत्व मिळेल. भारतातील मुस्लिमांचे नागरिकत्वच काढून टाकले जाईल, हा 'सीएए'बद्दलचा अपप्रचार निराधार आहे. कोणत्याही भारतीय नागरिकाचे नागरिकत्व संपुष्टात आणण्याची किंवा वंचित ठेवण्याची तरतूद या कायद्यात नाही. अर्थात कोणाही भारतीयाला स्वेच्छेने नागरिकत्वाचा त्याग करता येतोच. शेजारच्या अल्पसंख्याकांना खुले आमंत्रण मिळेल, असेही नाही. फक्त २०१४ पूर्वी भारतात आलेल्या निर्वासितांनाच या संधीचा लाभ घेता येईल. गेल्या शतकात या देशांतील हिंसक सांप्रदायिक राजकारणाला बळी पडलेल्यांना 'सीएए'मुळे मदत होईल. अल्पसंख्याकांच्या हक्कांबद्दल जागरूकता वाढल्याने आणि बांगलादेशासारख्या देशांतील राजकीय परिस्थिती सुधारली आहे, त्यामुळे या हिंसा कमी झाली असली तरी ती पूर्णत: निमालेली नाही.

निवडक श्रेणीतल्याच निर्वासितांना लवकर नागरिकत्व द्यायचे हा भेदभाव वगैरे काही ठरत नाही. कारण अनेक देशांनी वेळोवेळी निवडक निर्वासितांना नागरिकत्व दिलेले आहे. उदाहरणार्थ, व्हिएतनाम युद्धामुळे मोठ्या संख्येने व्हिएतनामी लोक निर्वासित झालेले होते, त्यावेळी जेराल्ड फोर्ड अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. तेव्हा तर व्हिएतनाममधून अन्यत्र आश्रय शोधणाऱ्यांना अमेरिकेत आणण्यासाठी अनेक खास विमानफेऱ्या (एअरलिफ्ट) घडवून सुमारे १,२०,००० जणांचे स्थलांतर करण्यात आले. ''निर्वासितांना त्यांच्या गरजेच्या वेळी दुर्लक्षित करणे म्हणजे, स्थलांतरितांचे राष्ट्र म्हणून अमेरिका जपत असलेल्या मूल्यांचा त्याग करणे होय आणि मी काँग्रेसला तसे करू देणार नाही''– हे राष्ट्राध्यक्ष फोर्ड यांचे त्या वेळचे उद्गार प्रसिद्धच आहेत.

'सीएए' ही ऐतिहासिक सुधारणा असली तरी, काही ना काही कारणे घडत गेली आणि तिच्या अंमलबजावणीचे नियम तयार करण्यासाठी चार वर्षांहून अधिक काळ लागला. चळवळीचा उद्रेक, त्यानंतर कोविड साथीच्या रोगामुळे निर्माण झालेल्या व्यत्ययामुळे हा विलंब झाला असावा. अंमलबजावणी कशी हवी, यावरही ऊहापोह होतच होता. हा कायदा 'छळ झालेल्या अल्पसंख्याक निर्वासितां'साठी असेल तर 'त्या देशात छळ झाला' हे सिद्ध कसे करायचे आणि कोणी, हा चर्चेचा विषय बनला. कारण आधी असे प्रस्तावित करण्यात आले होते की, निर्वासितांनीच त्यांच्या छळाचा पुरावा आणणे आवश्यक आहे. पण जे छळाला कंटाळून, सारे काही तिथेच सोडून इथे आश्रयासाठी आले त्यांना कागदोपत्री पुरावा जमवणे तर सरळच अशक्य आहे. अखेर, आताच्या राजपत्र अधिसूचनेने छळाच्या पुराव्याचा आग्रह न धरता परंतु यापैकी एका देशाच्या नागरिकत्वाचा पुरावा मागवून हे बंधन बरेचसे शिथिल केलेले आहे. त्याचप्रमाणे, पाच वर्षांहून अधिक काळ भारतात राहण्याच्या पुराव्यासंदर्भात नियम सुलभ करण्यात आले आहेत. मुक्कामाचा पुरावा म्हणून २०हून अधिक विविध प्रकारच्या कागदपत्रांपैकी कोणतीही जोडा, अशी परवानगी देण्यात आलेली आहे.

एवंच, 'सीएए' कायद्याच्या अंमलबजावणीचे नियमही लागू करून सरकारने काही दशकांपूर्वी दिलेले वचन पूर्ण केले आहे. आता या कायद्यावर तेच ते आक्षेप घेण्याऐवजी, या कायद्यातून होणाऱ्या प्रयत्नांच्या यशासाठी स्वयंसेवी संस्थांनी आणि जागरूक नागरिकांनी पुढे येणे आवश्यक आहे. निर्वासितांना या प्रक्रियेतून पार करण्यासाठी आणि या कायद्याच्या समाधानकारक अंमलबजावणीसाठी आपली मदत मोलाची ठरणार आहे!

**(श्री. राम माधव हे 'इंडिया फाउंडेशन'चे अध्यक्ष आणि रा. स्व. संघाशी संबंधित आहेत.)**

# विकास रथ बनला 'विकसित भारत'चा विश्वास रथ

## पीएम स्वनिधी योजना



केंद्रीय क्षेत्र योजना आहे ज्यामध्ये ५० हजार रुपयांपर्यंत खेळते भांडवल कर्ज सुविधा दिली जाते. नियमित परतफेड आणि डिजिटल देव-घेव यासाठी प्रोत्साहन दिले जाते. फेरीवाल्यांना सक्षम करण्यासाठी सहाय्य करत आहे. आर्थिकदृष्ट्या पुढे जाण्यासाठी नव्या संधीची कवाडे खुली करेल.

- ११,१९८ कोटी रुपयांची ८४.१० लाख कर्ज मंजूर.
- ४३% इतर मागासवर्ग आणि १९ टक्के अनुसूचित जातीचे लाभार्थी.
- ९२.३१ डिजिटल पेमेंटच्या वापरासाठी प्रोत्साहन म्हणून देण्यात आली.
- ४४% महिला लाभार्थी.

## पीएम विश्वकर्मा योजना



पीएम विश्वकर्मा योजनेचे उद्दिष्ट कारागीर आणि शिल्पकारांची उत्पादने आणि सेवांची पोहोच त्याचबरोबर गुणवत्तेत सुधारणा करण्यासह देशांतर्गत आणि जागतिक मूल्य साखळीत विश्वकर्मा एकीकृत होतील हे सुनिश्चित करणे हे आहे. १७ सप्टेंबर २०२३ ला योजना सुरु झाली.

- २४ लाख लाभार्थींना वित्त वर्ष २०२४-२५ पर्यंत योजनेत समाविष्ट करण्याचे उद्दिष्ट.
- ३.८२ लाख अर्जदारांची त्रिस्तरीय छाननीनंतर यशस्वीरित्या नोंदणी.
- ९७.६५ लाख अर्ज प्राप्त.
- १३ हजार कोटी रुपये २०३०-३१ पर्यंत योजनेवर करण्यात येतील खर्च.

## पीएम उज्वला योजना



पीएम उज्वला योजनेचा उद्देश गरीब महिलांना मोफत एलपीजी जोडणी देणे हा आहे. २०१६ मध्ये ही योजना सुरु करण्यात आली. महिलांना सबळ करणे, घरातले प्रदूषण कमी करणे, स्वयंपाक करण्यासाठी स्वच्छ इंधनाला प्रोत्साहन देणाऱ्या या योजने अंतर्गत १० कोटी पेक्षा जास्त जोडण्या देण्यात आल्या आहेत. ३०० रुपयांच्या अतिरिक्त अनुदानासह योजनेचा विस्तार करण्यात आला आहे.

- २३.१२ लाख अर्ज विकसित भारत संकल्प यात्रेत प्राप्त झाले.
- २.१६ कोटी जोडण्या उज्वला २.० मध्ये देण्यात आल्या.
- १०.१४ कोटी एकूण जोडण्या २९ जानेवारी २०२४ पर्यंत देण्यात आल्या.
- ३२.७६ लाख आधार सत्यापन एलपीजी ग्राहकांचे विकसित भारत संकल्प यात्रेदरम्यान करण्यात आले.

## स्टार्टअप इंडिया



मुख्य उपक्रम स्टार्ट अप इंडिया १६ जानेवारी २०१६ ला सुरु झाला ज्याचा उद्देश स्टार्ट अप संस्कृतीला प्रोत्साहन देण्याबरोबरच नवोन्मेष आणि उद्योजकतेची एक बळकट आणि समावेशक परिसंस्था तयार करणे हा आहे.

- १,२०,५५० मान्यता प्राप्त स्टार्ट अप आहेत देशाला.
- १२.४२ लाख प्रत्यक्ष रोजगार निर्मितीची माहिती स्टार्ट अपनी सरकारला दिली.
- ८०% जिल्ह्यात स्टार्टअप आहेत.
- ५६ हजार पेक्षा जास्त स्टार्टअपमध्ये किमान एक महिला संचालक आहे.


## प्रधानमंत्री मुद्रा योजना



बिगर कॉर्पोरेट, बिगर कृषी लघु-सुक्ष्म उद्योगांना तीन श्रेणीत १० लाख रुपयांपर्यंत तारण मुक्त कर्ज उपलब्ध करून देणारी योजना आहे.

- १.१२ कोटी रोजगार निर्मिती २०१५-२०१८ दरम्यान तीन वर्षात मुद्रा योजनेतून झाली. राष्ट्रीय स्तरावरच्या नमुना सर्वेक्षणातून ही माहिती समोर आली आहे.
- ६६% अतिरिक्त रोजगार निर्मितीत योगदान शिशु श्रेणीच्या मुद्रा कर्ज लाभार्थ्यांचे राहिले, १९% किशोर आणि १५% तरुण श्रेणीच्या कर्ज लाभार्थ्यांचे राहिले.

## स्टॅन्ड अप इंडिया



स्टॅन्ड अप इंडिया योजना ग्रीन फिल्ड उद्योग स्थापन करण्यासाठी प्रति बँक शाखा किमान एक अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या कर्जदाराला १० लाख ते १ कोटी रूपयापर्यंत बँक कर्जाची सुविधा प्रदान करे.

- २.१८ लाख अर्जदारांना देण्यात आली कर्ज.
- ४९.२५२ कोटी रुपयांहून अधिक कर्ज देण्यत आली.
- १.४८ लाख बँक शाखा देत आहेत कर्जाची सुविधा.

## आयुष्मान भारत पीएम-जय योजना

आयुष्मान भारत पीएम-जय जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना आहे. पूर्णतः कॅशलेस आणि पेपरलेस स्वरुपाची योजना आहे. वर्षाला १२ कोटींपेक्षा



जास्त गरीब आणि दुर्बल कुटुंबांना म्हणजे ५५ कोटी लाभार्थ्यांना रुग्णालयात दाखल होण्यासाठी ५ लाख रुपयांपर्यंतचा विमा देणे हे योजनेचे उद्दिष्ट आहे. भारतीय लोकसंख्येच्या तळाकडच्या स्तरातील ४०% लोक यामध्ये आहेत.

- २.७८ कोटींपेक्षा जास्त कार्ड विकसित भारत संकल्प यात्रेदरम्यान तयार करण्यात आली.
- ५१.०३ लाख कार्डे विकसित भारत यात्रेदरम्यान
- वितरित करण्यात आली.
- १३.३ लाख खाटांच्या २७,७४२ रुग्णालये योजनांच्या यादीत समाविष्ट, ११,९७३ खाजगी रुग्णालये समाविष्ट.
- ३०.८ कोटी आयुष्मान कार्डे २९ जानेवारीपर्यंत तयार करण्यात आली.
- ७९,१७४ कोटी रुपयांच्या खर्चाने ६.२२ कोटी लोकांना रुग्णालयात दाखल करण्याला मंजुरी देण्यात आली.

## पीएम आवास योजना- शहरी



पीएम आवास योजना- शहरी जून, २०१५ पासून लागू केली जात आहे. शहरी भागासाठी लागू असलेल्या या योजनेद्वारे सर्व पात्र लोकांना प्रत्येक हंगामात पक्की घरी उपलब्ध करण्यात येत आहेत. ३१ मार्च २०२२ पूर्वी मंजूर घरांना पूर्ण करण्यासाठी क्रेडीट लिंक सबसिडी योजना वगळता सर्व कार्यक्षेत्रांसह ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत सुरू ठेवण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

- ८०.०५ लाख घरे पूर्ण झाली आहेत.
- १.१८ कोटीपेक्षा जास्त घरांना मजुरी.
- २ लाख कोटी रुपयांचे केंद्रीय सहाय्य.

## स्वच्छ भारत अभियान - शहरी



शहरी भारताला हागणदारीमुक्त बनवण्यासाठी, कुशल घनकचरा व्यवस्थापन पद्धतींची स्थापना आणि वर्तनात बदल करण्याच्या उद्देशाने २ ऑक्टोबर २०१४ ला ही योजना सुरु करण्यात आली होती. पहिल्या टप्प्यात शहरी भारताने हागणदारीमुक्तीचा दर्जा प्राप्त केला. २०२६ पर्यंत कचरामुक्त शहरांच्या दृष्टीकोनासह १ ऑक्टोबर २०२१ रोजी स्वच्छ भारत मिशन शहरी २.० सुरु करण्यात आले होते.

- ६३.०४ लाख वैयक्तिक शौचालयांची उभारणी, तर लक्ष्य होते ५८.९९ लाखांचे.
- ६,३६८२६ सार्वजनिक शौचालयांची निर्मिती, तर लक्ष्य होते ५,०७,५८७ शौचालयांचे.
- १,१९१ शहरांना ओडीएफ+दर्जा
- ९०,९३५ वॉर्डात डोअर-टू-डोअर (दारोदारी) कचरा संकलनाला सुरूवात.


## पीएम ई-बस सेवा



शहरांमध्ये इलेक्ट्रिक बस (ई-बस) आधारित सार्वजनिक परिवहनाचा वाटा वाढवण्याच्या उद्देशाने पीएम ई-बस सेवा करण्यात आली आहे. ही योजना पीपीपी तत्वावर १०,००० इलेक्ट्रिक बस चालवण्यासाठी शहरांमध्ये २०,००० कोटी रुपयांच्या केंद्रीय मदतीने इलेक्ट्रिक बसचा वापर वाढवेल. कार्बन उत्सर्जनात कपात होईल, हरीत शहरी परिवहन उपक्रमांना सहकार्य मिळेल.

- १६ ऑगस्ट २०२३ रोजी पीएम ई-बस सेवेला मिळाली मंजुरी.
- १००% केंद्रीय मदत विधानसभा नसलेल्या केंद्रशासित प्रदेशात.
- ९०% केंद्रीय मदत डोंगराळ प्रदेश, ईशान्येकडील राज्ये, विधानसभावाले केंद्रशासित प्रदेश.

## अमृत योजना



देशातील सर्व वैधानिक शहरांना जल सुरक्षित बनवण्याच्या आणि सर्व घरांमध्ये कार्यात्मक जल नळ जोडण्या प्रदान करण्याच्या उद्देशाने अटल कायाकल्प आणि शहरी परिवर्तन मिशन(अमृत) सुरू करण्यात आले आहे.

- ४८५ (२५ जून २०१५ रोजी शहरे आणि गावांसाठी योजनेचा शुभारंभ).
- ८२,९५८ कोटी रुपयांचे ५,९०१ प्रकल्प निर्मिती अवस्थेत असून त्यापैकी ७५,५७१ कोटी रुपयांचे प्रकल्प पूर्ण झाले आहेत.
- ६० शहरे उत्तर प्रदेशच्या अमृत योजनेत समाविष्ट.

## पीएम भारतीय जन औषधि परियोजना



सर्वांना स्वस्त आणि दर्जेदार जेनेरिक औषधे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने, नोव्हेंबर २००८मध्ये प्रधानमंत्री भारतीय जनौषधी योजना सुरू करण्यात आली होती. यामध्ये जनौषधी केंद्र सुरू करण्यात आले आहेत.

- १,९६५ औषधे आणि २९३ सर्जिकल जिन्नस केंद्राच्या यादीत समाविष्ट आहेत.
- ५०.७२ कोटी जनौषधी सुविधा नॅपकीनची १ रुपये दराने विक्री करण्यात आली.
- गेल्या ९ वर्षात या केंद्रातून औषधे खरेदी करून सर्वसामान्यांनी केली २८,००० कोटी रुपयांची बचत.
- २१ हजारांपेक्षा जास्त युवांना योजनेत सहभागी करून

त्यांना स्थायी उपजीविकेचा स्रोत उपलब्ध केला.

● १०,६२४ जनौषधी केंद्र देशभरात ३१ जानेवारीपर्यंत सुरू. ५०-९०% स्वस्त असतात, खुल्या बाजारातील ब्रँडेड औषधांच्या तुलनेत येथे उपलब्ध असलेली औषधे. २५ हजार जनौषधी केंद्रे, ३१ मार्च २०२६ पर्यंत सुरू करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे.

### प्रादेशिक कनेक्टिव्हिटी योजना: उडान



प्रादेशिक कनेक्टिव्हिटी योजना- देशात सेवा नसलेल्या किंवा कमी सेवा असलेल्या विमानतळांसोबत प्रादेशिक कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी आणि सर्वसामान्यांसाठी हवाई प्रवास किफायतशीर बनवण्यासाठी 'उडे देश का आम नागरिक' ही योजना २१ ऑक्टोबर २०२१ रोजी सुरु करण्यात आली होती. द्वितीय आणि तृतीय श्रेणीच्या शहरांसोबत हवाई कनेक्टिव्हिटी वाढवण्यात येत आहे.

● ५१९ मार्गांना उडान सुरू झाल्यानंतर कार्यान्वित करण्यात आले.

● १.३३ कोटींपेक्षा जास्त प्रवाशांना आतापर्यंत उडान योजनेचा लाभ मिळाला आहे.

● ७६ विमानतळ, दोन वॉटर एरोड्रोम आणि ९ हेलिपोर्ट या योजनेत कार्यान्वित करण्यात आले आहेत.

● २१ ग्रीनफील्ड विमानतळांची निवड विकासाकरिता करण्यात आली आहे, त्यापैकी १२ कार्यान्वित झाले.

### वंदे भारत ट्रेन आणि अमृत भारत स्थानक योजना



भारताची पहिली देशी बनावटीची रचना आणि निर्मिती असलेली अर्ध अतिजलद वंदे भारत ट्रेन उन्नत सुरक्षा आणि सुविधांनी सुसज्ज करून सुरू केली. उच्च वेग, उन्नत सुरक्षा मापदंड आणि जागतिक दर्जाच्या सेवा ही या ट्रेनची ओळख आहे.

● अमृत भारत स्थानक योजनेत स्थानकांच्या विकासाची संकल्पना आहे. यामध्ये प्रत्येक स्थानकाचा बृहद आराखडा बनवून त्याचे कार्यान्वयन समाविष्ट आहे. स्थानकाच्या इमारतीत सुधारणा, शहराच्या दोन्ही बाजूंनी स्थानकाला एकीकृत करणे, दिव्यांगांसाठी सुविधांसहित इतर सोयीसुविधा निर्माण करणे देखील योजनेत समाविष्ट आहे.

● ८२ वंदे भारत रेल्वेगाड्या ३१ जानेवारीपर्यंत धावू लागल्या.

● १०,९८१ किलोमीटर मार्गावर रेल्वेची गती वाढवून ताशी १३० किमी करण्यात आली आहे.

● ताशी १६० किमी इतका वेग नवी दिल्ली ते मुंबई आणि नवी दिल्ली ते हावडा मार्गावर वाढवण्यासाठी काम चालू आहे.

● वंदे भारत रेल्वेगाड्यांनी भारतात बांधकाम क्षेत्राला मोठया प्रमाणात चालना दिली आहे.

### प्रधानमंत्री जीवन ज्योति बिमा योजना



केवळ ४३६ रुपये, वार्षिक हप्त्यावर १८-५० वयोगटातील लोकांना २ लाख रुपयांचे जीवन विमा संरक्षण प्रदान करण्याची योजना

● १६.२ कोटींपेक्षा जास्त नोंदणी.

### सिकल सेल ऍनेमिया निर्मूलन मिशन



आदिवासी भागात सर्व एससीडी रुग्णांना स्वस्त आणि दर्जेदार आरोग्य सुविधा मिळवण्यात सक्षम करणे, जागरुक करणे, पद्धतींमध्ये बदल करणे आणि स्क्रिनिंगच्या माध्यमातून या आजाराचा प्रसार कमी करणे ही या मिशनची उद्दिष्टे आहेत.

● १.७२ कोटी लोकांची स्क्रिनिंग करण्यात आली.

● ५.६९ लाख लोकांमध्ये सिकल सेल ट्रेट आढळले.

● १.०४ लाख लोक सिकल सेल पॉझिटिव्ह आढळले.

● लाख लोकांची स्क्रिनिंग विकसित भारत संकल्प यात्रेदरम्यान करण्यात आली, ज्यामध्ये सुमारे ७१ हजार

पॉझिटिव्ह आढळले. पॉझिटिव्ह आढळलेल्या रुग्णांना उच्च आरोग्य केंद्रांमध्ये पाठवण्यात आले.

### एकलव्य आदर्श निवासी शाळांमध्ये नोंदणी



एकलव्य आदर्श निवासी शाळांच्या स्थापनेच्या माध्यमातून एसटी बालकांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या उद्देशाने नॅशनल एज्युकेशन सोसायटी फॉर ट्रायब्बल स्टुडंट्स(एनईएसटीएस) स्थापन करण्यात आली आहे. ईएमआरएस निवासी व्यवस्थेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सहावी ते बारावी इयत्तेपर्यंत मोफत शिक्षण दिले जाते.

- ६९४ एकलव्य आदर्श निवासी शाळांना मंजूरी.
- २७२ शाळांचे ६९४ मंजूर शाळांपैकी निर्मिती कार्य पूर्ण झाले आहे.
- ४०२ शाळा सुरू आहेत.
- १.२३ लाख विद्यार्थी या शाळांमध्ये शिकत आहेत.

### शिष्यवृत्ती योजना



आदिवासी व्यवहार मंत्रालय नियोजनबद्ध मापदंडांनुसार राज्य, वैयक्तिक लाभार्थी आणि संस्थांना आर्थिक मदत करत आहे. या शिष्यवृत्ती योजनांतर्गत सुमारे ३० लाख एसटी विद्यार्थ्यांना डीबीटीच्या माध्यमातून मदत दिली ली जात आहे.

- ५.२७ लाख लाभार्थी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीमध्ये.
- २२.१९ लाख लाभार्थी मॅट्रिकपश्चात शिष्यवृत्तीमध्ये.

### वन धन विकास केंद्र



वन धन योजना 'किमान हमी भावा'च्या माध्यमातून लघु वनोत्पादनाच्या विपणनासाठी तंत्र आणि मूल्यसाखळी विकासाचा एक घटक आहे. १४ एप्रिल, २०१८ रोजी ही योजना सुरू झाली. संग्रह आणि एमएफबीची विक्री आदिवासीच्या वार्षिक उत्पन्नामध्ये ४०-६०% योगदान देते. मूल्य संवर्धन त्यांचे उत्पन्न तीन किंवा चार पट वाढवण्यात मदत करते. आदिवासींना ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते त्या गंभीर समस्यांचे निराकरण करण्याचे काम हा कार्यक्रम करतो.

- ३.२७ लाख कारागीर कुटुंबे ट्रायफेड केंद्रासोबत जोडलेली आहेत.
- ५५,०३६ वन धन बचत गट.
- ३,२२५ वन धन विकास केंद्र ३४० जिल्ह्यांमध्ये आहे.
- ९.६४ लाखांच्या जवळपास आहेत योजनेचे लाभार्थी.

### प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना



प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना (पीएम-जेकेएवाय) स्थलांतरित आणि गरीबांना मोफत अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी आत्मनिर्भर भारताचा एक भाग असलेली योजना आहे. ही योजना कोविड-१९ आपत्तीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांना विचारात घेऊन सुरू करण्यात आली होती. सुरुवातीच्या सात टप्प्यात २८ महिन्यात ३.९१ लाख कोटी रुपये खर्चाने ११.१८ कोटी टन अन्नधान्य वितरित करण्यात आले.

- ८१.३५ कोटी लोकांना पीएम गरीब कल्याण अन्न योजने अंतर्गत पुढील पाच वर्षे मोफत रेशन मिळेल.
- ११.८० लाख कोटी रुपये पाच वर्षात होणार खर्च.

### दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका मिशन



ग्रामीण विकास मंत्रालयाद्वारे कार्यान्वित एक प्रमुख दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम आहे, ज्याचा उद्देश गरीब कुटुंबांना फायदेशीर स्वयंरोजगार आणि कुशल मजुरीच्या रोजगारांपर्यंत पोहोचवण्यात सक्षम करून गरीबी कमी करणे हा आहे जेणेकरून गरिबांना सातत्याने आणि विविध उपजीविका पर्यायांच्या संधी मिळू शकतील.

- ९.९८ कोटींपेक्षा जास्त महिला परिवारांना ९०.३९ लाख बचत गटांमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.
- बचत गटांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी सरकारी

ई-मार्केटप्लेस जेममध्ये स्टोअर फ्रंटच्या स्वरुपात सरस कलेक्शन तयार करण्यात आले आहे. मंत्रालयाने ई-कॉमर्स साईटबरोबर सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

- बचत गटांच्या उत्पादनांचे ऑनलाईन मार्केटिंगसाठी मंत्रालयाकडून एक ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म (www.esaras.in) देखील सुरू करण्यात आला आहे.

## पीएम आवास योजना (ग्रामीण)



कच्च्या आणि मोडकळीला आलेल्या घरांमध्ये राहणाऱ्या २.९८ कोटी बेघर कुटुंबांना मार्च २०२४ पर्यंत पायाभूत सुविधांसह पक्की घरे उपलब्ध करून देणे हा ग्रामीण विकास

- मंत्रालयाकडून कार्यान्वित या योजनेचा उद्देश आहे.
- २.९४ कोटी घरांना लाभार्थ्यांना देण्यासाठी दिली आहे मंजुरी.
- २.५५ कोटींपेक्षा जास्त घरे एक फेब्रुवारीपर्यंत बांधून पूर्ण झाली आहेत.
- १.२० लाख रुपये मैदानी भागात आणि १.३० लाख रुपये डोंगराळ राज्यातील लाभार्थ्यांना मदत म्हणून दिले जातात.
- शौचालय निर्मिती, नळाने पाणी, वीज आणि एलपीजी कनेक्शन देखील देण्यात येतात.

## पीएम किसान सम्मान निधि



फेब्रुवारी २०१९ मध्ये सुरू झालेली केंद्रीय योजना आहे. पीएम किसान सन्मान निधी योजने अंतर्गत सर्व भूमीधारक शेतकरी कुटुंबांना तीन समान हप्त्यात दरवर्षी ६,००० रुपयांची मदत दिली जाते.

- ११ कोटीपेक्षा जास्त शेतकरी आहेत लाभार्थी.
- २.८१ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम १५ हप्त्यांमध्ये या लाभार्थ्यांना देण्यात आली.
- तीन समान हप्त्यांमध्ये थेट लाभ हस्तांतरण किंवा डीबीटीच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या बँक खात्यांमध्ये रक्कम पाठवली जाते.
- योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांची ओळख आणि पुष्टी करणे राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांची जबाबदारी आहे. विकसित भारत संकल्प यात्रेदरम्यान पीएम किसान योजनेत संतृप्ती अभियान राबवण्यात आले. ज्यामध्ये ५० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना या योजनेत सहभागी करण्यात आले.

## किसान क्रेडिट कार्ड



किसान क्रेडिट कार्ड, बँक आणि सहकारी समित्यांसह विविध संस्थांच्या माध्यमातून कृषी, मत्स्य पालन, पशुपालन आणि कुक्कुटपालन व्यवसायात सहभागी शेतकऱ्यांना सवलतीच्या व्याजदराने अल्पमुदतीचे कर्ज सुलभतेने उपलब्ध.

- २०१८-१९ मध्ये केसीसी योजना व्याजाच्या मदतीच्या लाभासह पशुपालक आणि मत्स्यपालकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.
- २०२३-२४ मध्ये घेतलेल्या कर्जावर ७% व्याज दर आणि १.५% व्याज मदत दर लागू आहे.
- वेळेवर कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दिले जाते ३% वार्षिक प्रोत्साहन.
- ७.४४ कोटी केसीसी खाती आहेत सक्रीय.
- कार्डधारक शेतकऱ्यांना रुपयांची या खात्यांची ९.१७ लाख कोटी रुपयांची या खात्यांची थकबाकी आहे.
- २६.२० लाख पशुपालक आणि १.०४ लाख मत्स्यपालकांची सक्रीय खाती.
- ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज सवलतीच्या व्याजदराने कार्डधारक शेतकऱ्यांना दिले जाते.

## उजाला योजना



उजाला देशाच्या ऊर्जा दक्षतेविषयीच्या जागरुकतेच्या प्रयत्नांचा एक भाग आहे. ५ जानेवारी २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या योजनेचा शुभारंभ केला होता.

ऊर्जेच्या कार्यक्षम वापराला प्रोत्साहन देणे, ऊर्जा कार्यक्षम उपकरणांच्या वापराबाबत ग्राहकांमध्ये जागरुकता वाढवणे, एलईडीच्या मागणीत वाढ करून त्यांच्या दरात कपात करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

- ३८२ कोटी बल्बची विक्री उजाला योजनेनंतर भारतीय बाजारात झाली.
- ३६.८६ कोटी एलईडी बल्ब ८ फेब्रुवारीपर्यंत करण्यात आले वितरीत.
- ४७,८८० एमएन किलोवॉट ऊर्जेची वर्षाला होत आहे बचत.
- १९,१५२ कोटी रुपयांची होत आहे वार्षिक बचत.
- ३.८७ कोटी टन कार्बन उत्सर्जनाची वार्षिक कपात.


## सौभाग्य योजना



गावांच्या शंभर टक्के विद्युतीकरणाच्या दिशेने पुढे जात देशातील सर्व बिगर विद्युतीकृत घरांमध्ये वीज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजना–सौभाग्य सुरू करण्यात आली. ही योजना केंद्र आणि राज्य सरकारच्या सहकार्याचा जगातील सर्वात मोठा उपक्रम आहे.

- २.६२ कोटी घरांचे करण्यात आले या योजने अंतर्गत विद्युतीकरण.
- ६.१९ लाख गावांचे योजनेत करण्यात आले विद्युतीकरण.

## डिजीटल पेमेंट पायाभूत सुविधा



वित्तीय क्षेत्र आणि अर्थव्यवस्थेला डिजिटल बनवण्याच्या भारत सरकारच्या धोरणाचा एक भाग म्हणून, गेल्या काही वर्षात डिजिटल पेमेंटचे व्यवहार सातत्याने वाढत आहेत. यामध्ये यूपीआय, यूपीआय१२३पे, रुपे डेबिट कार्ड, आयएमपीएस, भीम आधार पे, भारत बिल पेमेंट सिस्टिम, फास्टॅग, ई–रुपीसह काही इतर प्रणाली भारताची ओळख बनल्या आहेत.

- १३,४६२ कोटी डिजिटल व्यवहारांची २०२२–२३ मध्ये नोंद, २०१७–१८ मध्ये केवळ २०७१ कोटी व्यवहार झाले होते.
- ६२% डिजीटल व्यवहार २०२२–२३ मध्ये भीम–यूपीआयच्या माध्यमातून झाले.
- १२३ पेची सुरूवात फीचर फोन ग्राहकांसाठी करण्यात आली, सध्या २० भाषांमध्ये उपलब्ध आहे.
- १०८ लाख कोटी रुपयांचे व्यवहार चालू आर्थिक वर्षात ऑक्टोबर २०२३ पर्यंत झाले.

## खेलो इंडिया



खेलो इंडियामुळे प्रशिक्षण सुविधा किफायतशीर आणि घराजवळ उपलब्ध झाल्या आहेत. खेलो इंडिया युवा आणि विद्यापीठ स्पर्धांच्या माध्यमातून तळागाळात प्रत्येक स्तरावर प्रतिभावंतांचा विकास होत आहे. शिष्यवृत्ती आणि आर्थिक मदतीने खेळाडूंना आर्थिक अडचणींशिवाय प्रशिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यास सक्षम बनवले आहे. आता खेलो इंडिया केंद्रांवर १९,५०० हून अधिक खेळाडूंना माजी दिग्गज खेळाडू प्रशिक्षण देत आहेत.

- १७,००० हून अधिक क्रीडा विषयक पायाभूत सुविधा.
- २,५०० हून अधिक क्रीडा विषयक पायाभूत सुविधा ऑलिंपिक दर्जाच्या आहेत.
- ९०० हून अधिक खेलो इंडिया केंद्रांवर १३ हजारांहून अधिक खेळाडू प्रशिक्षण घेत आहेत.
- २,८४१ खेळाडूंना २१ क्रीडा प्रकारांमध्ये तरबेज बनवले जात आहे.
- २३,००० हून अधिक खेळाडूंना दिले जात

आहे प्रोत्साहन.

● ३,००० खेळाडूंना खेलो इंडिया खेळाडू म्हणून ओळख मिळवून दिली आहे.

● २३.६८ कोटी लोकांचा फिड इंडिया कार्यक्रमांमध्ये सहभाग.

● ६.२८ लाख रुपये वार्षिक इतकी रक्कम खेलो इंडिया खेळाडूंना प्रशिक्षण, मार्गदर्शन, आहार, वैद्यकीय विमा, किट इतर खर्चासाठी भत्ता म्हणून वार्षिक शिष्यवृत्ती दिली जात आहे.

● ८८० कोटी रुपये खेलो इंडिया अंतर्गत चालू आर्थिक वर्षात केले जात आहेत खर्च.

## पोषण अभियान



एक समन्वित दृष्टीकोन अवलंबून कालबद्ध पद्धतीने ०-६ वयोगटातील मुले, किशोरवयीन मुली, गरोदर आणि स्तनपान करणाऱ्या मातांच्या पोषण स्थितीत सुधारणा आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मार्च २०१८ मध्ये हे अभियान सुरू केले. पोषण अभियानची आता मिशन सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० चा भाग म्हणून पुनर्रचना करण्यात आली आहे.

● 'पोषण भी पढाई भी' योजना ६ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आहे ज्यामध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ओळखल्या गेलेल्या प्रमुख विकास नमूद केलेल्या प्रमुख विकास क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले जाते.

● पोषण हेल्पलाइन १४४०८ आहे जी तक्रार निवारणासाठी सुरु करण्यात आली आहे.

● १३.१ लाख अंगणवाडी सेविकांचे कौशल्य वाढवण्यासाठी वर्ष २०२३ ते २०२६ पर्यंत दोन टप्प्यांमध्ये त्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

● १०.०१ कोटी लाभार्थी पोषण ट्रॅकर ॲप्लिकेशनवर नोंदणीकृत आहेत.

● १०.१० कोटींहून अधिक आहेत योजनेचे लाभार्थी.

## हर घर जल- जल जीवन मिशन



१५ ऑगस्ट २०१९ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून जल जीवन मिशनचा प्रारंभ केला. ही जगातील सर्वात मोठी पाणीपुरवठा योजना आहे, जिचा उद्देश भारतातील प्रत्येक व्ययामीण कुटुंबाला कार्यक्षम घरगुती नळ जोडणी बरोबरच माफक सेवा वितरण शुल्क आकारून खात्रीशीर गुणवत्तेच्या पिण्याच्या पाण्याचा पुरेशा पमाणात (किमान ५५ एलपीसीडी) पुरवठा करून ग्रामीण जीवनात सुधारणा घडवून आणणे हा आहे.

● २.०२ लाख गावांनी स्वत:ची 'हर घर जल' म्हणून नोंद केली आहे, ज्यापैकी १.०१ लाखाहून अधिक गावे संबंधित ग्रामसभेद्वारा प्रमाणिक आहेत.


● २२.९८ लाखपेक्षा अधिक महिलांना फील्ड टेस्टिंग किट वापरून पाण्याची चाचणी घेण्यासाठी प्रशिक्षित केले आहे.

● सुरुवातीला केवळ ३.२३ कोटी (१७%) घरांमध्ये नळाद्वारे पाण्याची सोय होती, आज ही संख्या १४.२७ कोटी म्हणजे ७४% वर पोहोचली आहे.

● २,११८ पेयजल गुणवत्ता चाचणी प्रयोगशाळा सुरू.

● १ कोटी पाण्याच्या नमुन्यांची चाचणी फील्ड टेस्टिंग किट वापरून करण्यात आली आहे.

## अटल निवृत्ती वेतन योजना



असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी ९ मे २०१५ रोजी निवृत्तीवेतन प्रदान करण्याची योजना सुरू करण्यात आली. बँक किंवा टपाल कार्यालयात बचत खाते असलेली १८-४० वर्षे वयोगटातील व्यक्ती योजनेसाठी पात्र आहे.

● ६,१७,९६,३८९ अटल पेंशन योजनेतील नामांकन.

### जन-धन योजना




बँकेत खाते नसलेल्यांसाठी साधे बँक खाते उघडण्याची ही योजना आहे. २ लाख रुपयांच्या अपघात विमा योजनेबरोबरच एक विनामूल्य रूपे डेबिट कार्ड दिले जाते. १० हजार रुपये कर्जाची सुविधा जनधन खातेधारकांना मिळते.

● ५५.५४ कोटी पीएम जनधन खाती उघडण्यात आली आहे.

● २८.६० कोटी खाती महिलांनी उघडली आहेत.

● २.१७ लाख कोटी रुपये या खात्यांमध्ये जानेवारी २०२४ मध्ये जमा आहेत.

### स्वामित्व योजना



स्वामित्व योजना अत्याधुनिक ड्रोन सर्वेक्षण तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे ग्रामीण लोकसंख्येच्या अधिकारांची नोंद प्रदान करते. या योजनेचे अनेक फायदे आहेत - मालमत्ता बँक कर्जासाठी पात्र ठरल्या, मालमत्तेशी संबंधित तंटे कमी झाले, डिजिटल नकाशांच्या मदतीने व्यापक गाव पातळीवरील योजना समुदायांना बदलण्याची साधने प्रदान करेल.

● ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी स्वामित्व योजनेच्या अंमलबजावणीसाठी भारतीय सर्वेक्षण विभागाबरोबर सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे.

● २.९३ लाख गावांमध्ये ड्रोन सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले.

● १.७५ कोटींहून अधिक मालमत्ता कार्डे सुमारे ११० लाख गावांची बनून तयार आहेत.

● राज्य जमीन पडताळणी, दावे आणि आपत्तींचा निपटारा आणि मालमत्ता कार्डे तयार करण्यासाठी कठोर प्रक्रियेचे पालन करत आहे.

● गुजरात, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रसारखी काही राज्ये प्रत्यक्ष पडताळणीसाठी मोबाईल किंवा वेब आधारित ॲप्लिकेशन्सचा वापर करत आहेत.

### पीएम-प्रणाम



पीएम-प्रणाम म्हणजे धरणी मातेचे पुनर्संचयिकरण, जागरूकता, पोषण आणि सुधारणेसाठी एक कार्यक्रम आहे. राज्यांना पर्यायी खताचा अवलंब करण्यासाठी प्रोत्साहित करून रासायनिक खतांचा वापर कमी करणे हा या योजनेचा उद्देश आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने २८ जून २०२३ रोजी या योजनेला मंजुरी दिली.

● गेल्या ३ वर्षांच्या सरासरी वापराच्या तुलनेत रासायनिक खतांचा वापर कमी करून केलेल्या बचतीच्या ५०% संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशांना अनुदान स्वरूपात दिली जाईल.

● आर्थिक वर्ष २०२३-२४ संपल्यानंतर वापरात घट झाल्याची आकडेवारी समोर येईल.

### नॅनो खतनिर्मितीला प्रोत्साहन



नॅनो युरिया (द्रवरूप) एक नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानावर आधारीत खत आहे. यामध्ये मिश्रित ४% नॅनो नायट्रोजन गरज प्रभावीपणे पूर्ण करतो. पारंपारिक युरियाच्या तुलनेत नॅनो युरिया लक्ष्यित फवारणी सोपी बनवते आणि परिणामी रासायनिक खतांची गरज कमी होते. कार्यक्षमता वाढते आणि खर्चात बचत होते. अभ्यासात असे दिसून आले आहे की नायट्रोजनच्या प्रमाणित मात्रेसह टॉप ड्रेसिंग म्हणून नॅनो युरियाच्या दोन फवारण्यामुळे उत्पादनात ३-८% लाभ झाला आहे. ■

पाक्षिक मनोगत प्रदेश बीजेपी

# 'खेलो इंडिया'द्वारे उदयोन्मुख प्रतिभेचा शोध

**केंद्रीय** युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी चंदीगड येथील सेक्टर ७ क्रीडा संकुलात अनोख्या खेलो इंडिया उदयोन्मुख प्रतिभा शोध (कीर्ती) कार्यक्रमाचे उद्घाटन केले. देशाच्या कानाकोपऱ्यातून प्रतिभावान खेळाडूंचा शोध घेणे आणि अमली पदार्थांची व्यसनाधीनता आणि इतर लक्ष विचलित करणाऱ्या साधनांपासून रोखण्यासाठी खेळाचा एक साधन म्हणून वापर करणे ही नऊ ते १८ वर्षे वयोगटातील शालेय मुलांसाठी असलेल्या, देशव्यापी योजनेची दोन मुख्य उद्दिष्टे आहेत.

ठाकूर यांनी सांगितले की कीर्ती हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे क्रीडा संस्कृती रुजवण्याचे आणि ऑलिम्पिक आणि आशियाई खेळांसारख्या जागतिक स्पर्धांमध्ये भारताला पदके मिळवून देणारे प्रतिभावान खेळाडू घडवण्याचे स्वप्न होते. कीर्तीचे भारतातील ५० केंद्रांवर भव्य उदघाटन झाले. ऍथलेटिक्स, मुष्टियुद्ध, कुस्ती, हॉकी, फुटबॉल सह १० क्रीडाप्रकारातील पहिल्या टप्प्यात पन्नास हजार अर्जदारांचे मूल्यांकन केले जात आहे. अधिसूचित प्रतिभा मूल्यांकन केंद्रांद्वारे प्रतिभावान खेळाडू पारखण्यासाठी वर्षभरात देशभरात २० लाख मूल्यांकन करण्याचे कीर्तीचे उद्दिष्ट आहे.

या प्रमाणात शोध आणि प्रशिक्षण कार्यक्रम हा भारतामधील पहिला कार्यक्रम आहे आणि तो अशा वेळी सुरू होत आहे जेव्हा देशाला २०३६ पर्यंत जगातील अव्वल १० क्रीडा राष्ट्रांपैकी एक राष्ट्र बनायचे आहे आणि २०४७ पर्यंत अव्वल पाचमध्ये स्थान मिळवायचे आहे असे ठाकूर यांनी उद्धृत केले. युवक हे राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत आणि क्रीडा क्षेत्रात विजयासाठी लहानपणापासूनच प्रारंभ करायला हवा यावर ठाकूर यांनी भर दिला. ऑलिम्पिक पदक जिंकण्यासाठी खेळाडूला किमान १० वर्षांची तयारी आवश्यक असल्याचे सांगून मंत्री म्हणाले, कीर्तीला देशातील प्रत्येक तालुक्यापर्यंत पोहोचायचे आहे आणि अशा मुलांशी संपर्क साधायचा आहे ज्यांना खेळण्याची आवड आहे परंतु त्याचे तंत्र अवगत नाही. आम्हाला माहित आहे की खेळ खेळणारे प्रत्येक मूल पदक जिंकू शकत नाही, परंतु किमान खेळाद्वारे तरुणांना अमली पदार्थ आणि इतर व्यसनांपासून दूर ठेवण्याचा आमचा मानस आहे. प्रत्येक मुलाने माय भारत पोर्टलवर नोंदणी करण्याचे मी आवाहन करतो आणि त्यांच्यापर्यंत पोहोचून कीर्तीद्वारे संधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आमची असेल. कीर्तीचा खेळाडू- केंद्रित कार्यक्रम माहिती तंत्रज्ञानावर आधारित पारदर्शक निवड पद्धतीमुळे सुस्पष्ट आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित माहिती विश्लेषणाचा उपयोग एखाद्या आकांक्षी खेळाडूमधील क्रीडा नैपुण्य जोखण्यासाठी केला जात आहे. या विस्तृत प्रतिभा शोध प्रणालीसाठी राष्ट्रीय क्रीडा महासंघ आणि राज्य सरकार यांच्याशी धोरणात्मक सहयोगाची आवश्यकता असेल असे ठाकूर यांनी नमूद केले. सरकारने पायाभूत सुविधांवर आधीच ३००० कोटी रुपये खर्च केले आहेत आणि देशभरात १००० हून अधिक खेलो इंडिया केंद्रे आहेत असेही त्यांनी स्पष्ट केले. ■




## खेलो इंडिया मिशन

**खेलो इंडिया योजना ही केंद्रसरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाची महत्वाकांक्षी योजना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून उतरलेल्या खेलो इंडिया मिशनचे उद्दिष्ट देशात क्रीडा संस्कृती रुजवणे आणि क्रीडा क्षेत्रात उत्कृष्टता प्राप्त करणे, हे आहे. ज्यामुळे देशातील क्रीडापटू आपल्या सर्वोत्तम कामगिरीमधून जागतिक क्रीडा क्षेत्रात प्रभाव पाडतील. खेलो इंडिया योजनेच्या क्रीडा स्पर्धा आणि प्रतिभा विकास उपक्रमांतर्गत, प्रतिभा ओळख आणि विकास हा घटक देशातील क्रीडा परिसंस्था विकसित करण्यासाठी तळागाळातील आणि उच्चभ्रू स्तरावरील खेळाडूंची निवड करून त्यांच्या विकासाकरता काम करण्यासाठी समर्पित आहे.**

# एक लाख कोटी रुपयांच्या 112 राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचे लोकार्पण आणि पायाभरणी



**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी हरयाणातील गुरुग्राम येथे देशभरातील सुमारे एक लाख कोटी रुपये खर्चाच्या ११२ राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचे लोकार्पण आणि पायाभरणी केली. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देशभरातून लाखो लोक या कार्यक्रमाशी जोडले गेले. पंतप्रधानांनी ऐतिहासिक द्वारका द्रुतगती मार्गाच्या हरियाणा विभागाचे उद्घाटन केले. ८ पदरी द्वारका द्रुतगती मार्गाचा १९ किमी लांबीचा हरियाणा विभाग सुमारे ४,१०० कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आला असून त्यात १०.२ किमी लांबीच्या दिल्ली–हरियाणा बॉर्डर ते बसई रेल्वे उड्डाणपूल (आरओबी) आणि ८.७ किमी लांबीच्या बसई रेल्वे उड्डाणपूल ते खेरकी दौला अशा दोन पॅकेजेसचा समावेश आहे. हा मार्ग दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि गुरुग्राम बायपासला थेट कनेक्टिव्हिटी देखील प्रदान करेल. पंतप्रधानांनी उद्घाटन केलेल्या इतर प्रकल्पांमध्ये दिल्लीतील नानगलोई–नजाफगढ रोड ते सेक्टर २४ द्वारका सेक्शन यामधील ९.६ कि.मी.चा सहापदरी अर्बन एक्स्टेंशन रोड (UER-II) पॅकेज थ्री, उत्तरप्रदेशातील लखनौ रिंग रोडवरील ४,६०० कोटी रुपये खर्चून विकसित केलेली तीन पॅकेजेस, आंध्र प्रदेशातील NH१६ वरील आनंदपुरम–पेंडुर्थी–अनकापल्ली हे २,९५० कोटी रुपये खर्चून बांधलेला विभाग, हिमाचल प्रदेशातील NH–२१ वरील ३,४०० कोटीं रुपये खर्चाचे किरातपूर ते नेरचौक सेक्शन (२ पॅकेजेस), कर्नाटकातील २,७५० कोटी रुपये खर्चाचा दोबासपेठ– हेस्कोट सेक्शन, याशिवाय देशभरात विविध राज्यांमध्ये २५,५०० कोटी रुपयांचे ४२ इतर प्रकल्पांचा समावेश आहे. पंतप्रधानांनी देशभरातील विविध ठिकाणच्या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांची पायाभरणी सुद्धा केली. पायाभरणी केलेल्यापैकी महत्वाच्या प्रकल्पांमध्ये आंध्र प्रदेशातील बेंगळुरु कडप्पा–विजयवाडा एक्स्प्रेस–वे वरील १४,००० कोटी खर्च असणारी १४ पॅकेजेस, कर्नाटकातील NH–७४८ वरील बेळगाव–हुंगुंड–रायचूर विभागामधील रु. ८,००० कोटी खर्चाची ६ पॅकेजेस, हरयाणातील ४,९०० कोटी रुपये खर्चाची शामली–अंबाला महामार्गावरील ३ पॅकेजेस, पंजाबातील अमृतसर भटींडा कॉरिडॉरमधील ३,८०० रुपये खर्चाची २ पॅकेजेस, याशिवाय देशभरात वेगवेगळ्या राज्यांमध्ये ३२,७०० कोटी रुपये खर्चाचे ३९ इतर प्रकल्प यांचा समावेश आहे. पंतप्रधान म्हणाले, पूर्वी विलंब होत होता, आता वितरण होत आहे. पूर्वी विलंब होत होता, आता विकास होत आहे. ते म्हणाले की ९ हजार किमीचा जलदगती कॉरिडॉर तयार करण्यावर लक्ष केंद्रित केले जात असून त्यापैकी ४ हजार किमी आधीच बांधण्यात आले आहे. वर्ष २०१४ मध्ये ५ शहरांपूर्ती मर्यादित असलेली मेट्रो आता २१ शहरांपर्यंत पोहोचली आहे. हे काम विकासाच्या दृष्टीकोनातून केले जात आहे. हेतू योग्य असताना या गोष्टी घडतात. आगामी ५ वर्षांत विकासाचा हा वेग अनेक पटींनी वाढेल, असा विश्वास व्यक्त करत पंतप्रधानांनी भाषणाचा समारोप केला. एक लाख कोटींहून अधिक खर्चाच्या १०० हून अधिक प्रकल्पांमध्ये दक्षिणेकडील कर्नाटक, केरळ आणि आंध्र प्रदेशातील विकास प्रकल्पांचा समावेश आहे, उत्तरेकडील उत्तर प्रदेश आणि हरयाणाशी संबंधित विकास कामे आहेत, पूर्वेकडे बंगाल आणि बिहारचे प्रकल्प आहेत तर, पश्चिमेकडे, महाराष्ट्र, पंजाब आणि राजस्थानमधील मोठे प्रकल्प आहेत. या प्रकल्पांमध्ये अमृतसर भटिंडा जामनगर मार्गिकेचा ५४०किलोमीटरचा विस्तार आणि बंगळुरू रिंग रोडचा विकास यांचा समावेश आहे, या प्रकल्पांमध्ये महाराष्ट्र राज्यातील रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या (एमओआरटीएच) पाच प्रकल्पांचा समावेश आहे, ज्यांचा एकूण प्रकल्प खर्च ३२९७ कोटी रुपये आहे. ■

## महाराष्ट्रातील प्रकल्प खालीलप्रमाणे

वडीगोद्री- १९४ कोटी रु.खर्चाचा धनग्रीपिंप्री महामार्ग

१५९८ कोटी रु.खर्चाचा वडपाळे-भोगाव खुर्द प्रकल्प.

अहिल्यानगर (अहमदनगर) बायपास-खरवंडी प्रकल्प खर्च २२६ कोटी रु. खर्चाचा

राहुरी- सोनई-शनी शिंगणापूर हा १३६ कोटी रु.खर्चाचा प्रकल्प.

एनएचडीपी टप्पा- IV (Pkg-IV) अंतर्गत एचएएम मोडवर NH-66 च्या कशेडी घाट-परशुराम घाट विभाग Km 161/600-Km 205/400 च्या ४-पदरी पुनर्वसन आणि आधुनिकीकरण प्रकल्पाचा खर्च ११४३ कोटी रुपये आहे.

## म्हैसूर येथे ४००० कोटी रुपयांच्या २६८ किलोमीटर लांबीच्या २२ राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांची पायाभरणी

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी कर्नाटकात म्हैसूर येथे नुकतीच २६८ किलोमीटर लांबीच्या आणि ४००० कोटी रुपयांहून जास्त खर्चाच्या २२ राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांची पायाभरणी केली. विशेष म्हणजे हुल्लीयार - के बी क्रॉस - चुंचनहल्ली - नेल्लीगेरे मार्ग यासारख्या मार्गांमुळे म्हैसूर आणि उत्तर कर्नाटकामधील वाहतूक सुविधा अजून वाढेल. म्हैसूर रिंग रोड हा सर्विस रोड आणि ठणइड सह पूर्ण होणारा प्रकल्प शहरातील वाहतुकीची गर्दी कमी करेल आणि सुरळीत वाहतूकीची हमी देईल. बेळूर-हसन आणि येडगौडानहळ्ळी बिळीकेरे रस्त्याचे चौपदरीकरण तसेच हंगरहळ्ळी आणि होलेनरसीपुर बायपास मार्गे प्रवासाच्या वेळेत दोन तासाची बचत करणे हे उद्दिष्ट आहे. हुन्सूर शहरातील गर्दी कमी करण्यासाठी लक्ष्मणतीर्थ नदीवरील मुख्य पुलाची उभारणी करणे आवश्यक आहे. यामुळे सुटसुटीत शहर नियोजनाशी बांधिलकी राखली जाईल. याशिवाय श्रीनिवासपुरा आणि चिंतामणी हे दोन्ही बायपास दोन्ही शहरांमध्ये गर्दी कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

# पीक विमा योजनेच्या नोंदणीत 27 टक्क्यांनी वाढ

**पंतप्रधान** पीक विमा योजनेच्या गेल्या ८ वर्षांतील काळात ५६.८० कोटींहून अधिक शेतकरी अर्जदारांची नोंदणी झाली तर २३.२२ कोटींहून अधिक शेतकरी अर्जदारांना त्यांनी केलेल्या दाव्याचे पैसे मिळाले आहेत. या काळात शेतकऱ्यांनी आपल्या हिश्शाच्या स्वरुपात सुमारे ३१,१३९ कोटी रुपये दिले तर त्यांना दाव्याच्या स्वरुपात १,५५,९७७ कोटी रुपये मिळाले आहेत. अशा प्रकारे, शेतकऱ्यांनी भरलेल्या प्रत्येक १०० रुपयांच्या हप्त्यासाठी त्यांना दाव्याच्या स्वरुपात सुमारे ५०० रुपये मिळाले आहेत. पंतप्रधान पीक विमा योजना ही मागणीभिमुख योजना आहे आणि ती राज्यांसाठी तसेच शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक आहे. २०२१-२२ आणि २०२२-२३ दरम्यान शेतकऱ्यांच्या अर्जांची संख्या अनुक्रमे ३३.४% आणि ४१ टक्के वाढली आहे. २०२३-२४ या वर्षात, योजनेअंतर्गत नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांच्या संख्येत आतापर्यंत २७ टक्के वाढ झाली आहे. तसेच आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये, योजनेअंतर्गत विमा उतरवलेल्या एकूण शेतकऱ्यांपैकी ४२ टक्के बिगर कर्जदार शेतकरी आहेत. हफ्त्याचा विचार करता ही जागतिक स्तरावर तिसरी सर्वात मोठी विमा योजना आहे. योजनेची सुरुवात २०१६ मध्ये झाली. शेतकऱ्यांना पिकांचे नुकसान किंवा अनपेक्षित घटनांमुळे होणाऱ्या नुकसानीपासून संरक्षण देणे हा याचा उद्देश आहे. पीएमएफबीवाय ही केंद्र क्षेत्रीय योजना आहे, त्यामुळे या योजनेअंतर्गत राज्य/केंद्रशासित प्रदेशनिहाय वाटप आणि निधी दिला जात नाही. विशेषतः त्याच्या अंमलबजावणीतील आव्हानांचा सामना करण्यासाठी संबंधित घटकांबरोबर विचारविनिमय करून या योजनेचा नियमितपणे आढावा घेतला जातो. ही योजना सर्व शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक बनवणे, विमा कंपन्यांनी गोळा केलेल्या एकूण हप्त्याच्या किमान ०.५ टक्के रक्कम माहिती, शिक्षण आणि संपर्क (आयईसी) उपक्रमांसाठी अनिवार्यपणे वापरणे, तंत्रज्ञानाचा सखोल वापर, केंद्र आणि राज्य सरकार यांच्यात एनईआरमधील आर्थिक वाटपाच्या पद्धतीत ५०:५० वरून ९०:१०' असा बदल करणे, विमा कंपन्यांनी दीर्घकालीन म्हणजे ३ वर्षांचा करार करणे, तंत्रज्ञानाचा वापर इ. यांचा प्रमुख सुधारणांमधे समावेश आहे. ■

# मतदार यादी वाचन



**पुणे- उपस्थिती-** प्रिती पाटील, धनंजय दगडे-पाटील, गणेश कोकाटे, निलेश कोकाटे, सचिन मोरे आदी.



**बारामती- उपस्थिती-** नगरसेवक दिलीप वेडेपाटील, बूथप्रमुख व शक्ति केंद्र प्रमुख, मतदार नागरिक आदी.



**पुणे- उपस्थिती-** सुपर वॉरियर आणि बूथ प्रमुख, स्वीकृत नगरसेवक सचिन धांगट आदी.



**सोलापूर- उपस्थिती-** सुपर वॉरियर्स विजय इप्पाकायल, बुथ महिला प्रमुख कांचना गदगे, वनिता सुरम, पद्मा द्यावंनपल्ली, हर्षल माळवादकर, रमेश सुंचु, राजू पानगंटी, प्रभाकर द्यावनपल्ली, इरण्णा कुणगेरी, अमरनाथ म्हंताटी आदी.



**लातूर शहर जिल्हा बैठक- उपस्थिती-** शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, सोशल मीडिया प्रमूख व बूथ स्तर कार्य सदस्य रवी सुडे आदी.



**ठाणे- उपस्थिती-** शक्ती केंद्रप्रमुख मकरंद पाठारे, बूथप्रमुख क्षमा पातकर दिलीप मिश्रा आदी.



**रायगड- उपस्थिती-** शक्तिकेंद्र प्रमुख विद्या तामखडे, बूथ अध्यक्ष वैशाली साबळे, आ. प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अविनाश कोळी आदी.



**ठाणे- उपस्थिती-** इमरोज खान, उजेफा शेख, गणेश लोखंडे, उषा वाघ, तेजस वाघ, दीपक लोखंडे आदी.



अनुसूचीत जाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष दिलीपकुमार गायकवाड यांनी २० हजार ८८७ एवढे 'नमो ॲप' डाऊनलोड करुन घेतले. याबद्दल प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी श्री. गायकवाड यांचे अभिनंदन केले आहे.



**पिंपरी-चिंचवड- मतदार यादी वाचन- उपस्थिती-** अमित गवळी, ऋषिकेश होनमाने, विनायक शिंदे, गणेश ढोरे, युवराज ढोरे, हिरण सोनवणे, अमोल गायकवाड.




**सांगोला (जि.)- बूथ संमेलन- उपस्थिती-** पश्चिम महाराष्ट्र सघंटन मंत्री मकरंद देशपांडे, पश्चिम महाराष्ट्र विभाग बूथ संयोजक योगेश बाचल, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत आदी.



**सांगली- लाभार्थी संपर्क अभियान- उपस्थिती-** प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, भाजपा प्रचार प्रमूख सम्राटबाबा महाडीक, सरपंच पै.जयकर कदम, आयूष्मान भारत, अध्यक्ष जयदिप कदम आदी.



**सातारा- लाभार्थी संपर्क अभियान- उपस्थिती-** प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, सचिन घाटगे, लोकसभा विस्तारक गणेश सुतार, जिल्हा उपाध्यक्ष अजय मांढरे, विधानसभा विस्तारक अलंकार सुतार आदी.



**सोलापूर- लाभार्थी संपर्क अभियान- उपस्थिती-** सुपर वॉरियर्स विजय इप्पाकायल, वनिता सुरम, पद्मा द्यावंनपल्ली, हर्षद माळवादकर आदी.



**नाशिक- बूथ प्रमुख चर्चा बैठक- उपस्थिती-** शहर अध्यक्ष प्रशांत जाधव, मंडल अध्यक्ष वसंत उशीर, अनिल भालेराव, राम बडोदे, रवींद्र गांगुर्डे, मीनाक्षी वैद्य, नंदकुमार देसाई, प्रदीप पाटील आदी.

# संकल्प पत्र सूचना



महिला मोर्चा लातूर शहर उपाध्यक्ष सुमन राठोड यांनी भाजपा संकल्पपत्रासाठी दीड हजारांहून अधिक सूचना जमविल्या आहेत. फॅक्टरी कोच,रेल्वे कोच, शैक्षणिक संस्थांमध्ये जाऊन त्यांनी या सूचना जमा केल्या. या सूचना सुमन राठोड यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सुपूर्द केल्या.



**शेवगांव-पाथर्डी- उपस्थिती-** पाथर्डी नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, तालुकाध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, माजी उपनगराध्यक्ष नंदकुमार शेळके, निवडणूक प्रमुख नारायण पालवे, युवा मोर्चा अध्यक्ष सचिन वायकर, माजी नगरसेवक नामदेव लबडे, बजरंग घोडके, ख.वि.संघ संचालक पुरुषोत्तम इजारे, रमेश काटे, राजेंद्र साप्ते, महेश बोरुडे, बाळासाहेब शेळके आदी.








प्रदेश पदवीधर प्रकोष्ठतर्फे नवी मुंबई, पनवेल, रायगड, धुळे, जळगाव, नंदुरबार या ठिकाणी संकल्प पत्रासाठी सूचना पेट्या ठेवण्यात आल्या होत्या. प्रकोष्ठचे संयोजक धनराज विसपुते यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. सुमारे २ हजार सूचना या उपक्रमातून प्राप्त झाल्या.



'बेटी बचाओ, बेटी पढाओ' प्रकोष्ठतर्फे सुमारे ११०० सूचना एकत्रित करून प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे देताना प्रकोष्ठच्या प्रदेश संयोजक डॉ.शुभा पाध्ये-फरांदे.



अनुसूचित जमाती मोर्चाचे (एसटी) प्रदेशाध्यक्ष उत्तमराव इंगळे यांनीही संकल्प पत्रासाठी सूचना मागवण्याच्या अभियानात सहभाग घेऊन प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना या सूचना सुपुर्द केल्या. लोकसभा निवडणूक व्यवस्थापन समिती अध्यक्ष आ. श्रीकांत भारतीय, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, सह मुख्य प्रवक्ते आशिष देशमुख आदी.



अमरावतीच्या अपक्ष खासदार नवनीत राणा, बडनेराचे आमदार रवी राणा यांचा प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, विदर्भ संघटनमंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, अमरावती ग्रामीण भाजपा अध्यक्ष व खा. अनिल बोंडे, खा. सुनील मेंढे, अमरावती भाजपा जिल्हाध्यक्ष आ. प्रविण पोटे–पाटील आदी.




प्रदेश काँग्रेसचे सचिव डॉ. नितीन कोडवते, डॉ.चंदा कोडवते यांचा प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खा.अशोक नेते, आ.बंटी भांगडिया, बाबुराव घोडे, मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.



आपचे प्रदेश मिडिया प्रमुख चंदन पवार, डॉ. शरद बोडके, बाळासाहेब बोडके, रवींद्र पवार, महेंद्र अहिरे यांचा प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश सह मुख्य प्रवक्ते अजित चव्हाण आदी.



प्रदेश आदिवासी काँग्रेसचे अध्यक्ष माजी आमदार नामदेव उसेंडी यांचा प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आ.बंटी भांगडिया, सह मुख्य प्रवक्ते व ओबीसी मोर्चाचे प्रभारी आशिष देशमुख आदी.

# पक्ष प्रवेश



**पंजाबचे काँग्रेस खासदार रवनीत सिंग बिट्टू– उपस्थिती–** राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, सह मीडिया प्रमुख संजय मयुख.



**अमेरिकचे माजी राजदूत तरंजीत सिंह संधू– उपस्थिती–** राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, अरुण सिंह, तरुण चुग, राष्ट्रीय चिटणीस मजिंदर सिंह सिरसा.



**काँग्रेस खासदार नवीन जिंदल– उपस्थिती–** राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे




**माजी भारतीय हवाई दलप्रमुख आर.के.भदौरिया, माजी खासदार वरप्रसाद राव– उपस्थिती–** राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर, सह मीडिया प्रमुख संजय मयुख आदी.



**काँग्रेसचे आमदार राजेंद्र भंडारी– उपस्थिती–** वाणिज्य आणि उद्योग केंद्रीय मंत्री पियूष गोयल, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, राष्ट्रीय सरचिटणीस दुष्यंत कुमार, मुख्य प्रवक्ते–मीडिया प्रभारी अनिल बलूनी, सह मीडिया प्रमुख संजय मयुख आदी.




**तृणमूल काँग्रेसचे खासदार अर्जुन सिंह, दिव्येंदू अधिकारी–** उपस्थिती राष्ट्रीय सरचिटणीस दुष्यंत कुमार, सह मीडिया प्रमुख संजय मयुख आदी.



**बसपा खासदार संगीता आझाद, माजी आमदार आझाद अरी मर्दन, अधिवक्ता सीमा कुशवाह– उपस्थिती–** राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, सह मीडिया प्रमुख संजय मयुख आदी.



**खासदार प्रणीत कौर– उपस्थिती–** राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, अरुण सिंह, तरुण चुग, मुख्य प्रवक्ते–मीडिया प्रभारी अनिल बलूनी, पंजाब प्रदेशाध्यक्ष सुनील जाखड, विजय रूपाणी आदी.




**झारखंड मुक्ती मोर्चाचे आमदार सीता सोरेन– उपस्थिती–** राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, सह मीडिया प्रमुख संजय मयुख आदी.



**अनुराधा पौडवाल– उपस्थिती–** राष्ट्रीय सरचिटणीस अरुण सिंह, मुख्य प्रवक्ते–मीडिया प्रभारी अनिल बलूनी, सह मीडिया प्रमुख संजय मयुख.



**हिमाचल प्रदेशचे सहा माजी काँग्रेस आमदार, तीन माजी अपक्ष आमदार– उपस्थिती–** राष्ट्रीय सरचिटणीस अरुण सिंह, केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर, राष्ट्रीय माध्यम सह–प्रमुख संजय मयुख. हिमाचल प्रदेश अध्यक्ष राजीव बिंदल.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp










**प्रति,**

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com